RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com · Vidabh Kesari News · 90969 45629 · @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक विदर्भाचा मानबिंदू

# विदर्भ केसरी

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती
९ सोमवार मार्च २०२६
✲ वर्ष ५ ✲ अंक २८२
✲ पृष्ठ : ६ ✲ मूल्य रु : ३

# विश्वविजयी भारत!

## ‘सूर्या’सेनेचा डंका : टीम इंडियाने राखलं टी२० वर्ल्डकपचं जेतेपद

**▸विदर्भ केसरी।**


अहमदाबादच्या जगातल्या सगळ्यात मोठ्या स्टेडियमवर सव्वा लाख चाहत्यांच्या साक्षीने भारतीय संघाने दणदणीत वर्चस्वासह टी२० वर्ल्डकपच्या अंतिम लढतीत न्यूझीलंडचा धुव्वा उडवत जेतेपदावर नाव कोरलं.२०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय संघाने जेतेपदाची कमाई केली होती. आतापर्यंत कोणत्याच संघाला जेतेपद कायम राखता आलं नव्हतं. दोन वर्षांपूर्वी रोहितसेनेचा भाग असणाऱ्या सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघाने अंतिम मुकाबल्यात प्रथम फलंदाजी करताना २५५ धावांचा डोंगर रचला. संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशन या आघाडीच्या शिलेदारांनी वादळी अर्धशतकी खेळी साकारत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या डोंगरासमोर खेळताना न्यूझीलंडने नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. तिलक वर्माने लॉकी फर्ग्युसनचा झेल घेताच खेळाडूंनी एकच जल्लोष केला. न्यूझीलंडचा डाव १५९ धावांतच आटोपला. कपिल देव, महेंद्रसिंग धोनी, रोहित शर्मा या आयसीसी स्पर्धांची जेतेपदं पटकावणाऱ्या कर्णधारांच्या मांदियाळीत सूर्यकुमारचा समावेश झाला आहे.



# अकोल्यात देशातील सर्वाधिक तापमान

**▸विदर्भ केसरी। मुंबई :**

**विदर्भातील अकोला येथे रविवारी देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. अकोल्यात ४०.९ इतक्या तापमानाची नोंद झाली असून, अकोला, अमरावती, वर्धा येथे उष्णतेच्या लाटेची स्थिती निर्माण झाली आहे. पुढील दोन दिवस विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी उष्णतेची लाट सदृशस्थिती निर्माण होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.**





- **प्रमुख शहरातील तापमान (अंश सेल्सिअस)**
- **अकोला – ४०.९, अमरावती ३९.२, वाशिम ३९.६, वर्धा ३९.२, परभणी ३८.४, सांताक्रुज ३५.८, पुणे (लोहगाव) ३९.९**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार रविवारी देशात सर्वाधित ४०.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोल्यात झाली आहे. त्या खालोखाल अमरावतीत ३९.२, वर्ध्यात ३९.२ आणि वाशिमध्ये ३९.६ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. विदर्भासह मराठावाडा आणि मध्य महाराष्ट्रात पुढील दोन दिवस काही ठिकाणी उष्णतेची लाट सदृशस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून, हवामान विभागाने पिवळा इशारा दिला आहे. कोकण किनारपट्टीवर उष्ण आणि दमट हवामानाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

उन्हाळ्याची सुरूवात झाली आहे. सुमारे महिनाभरापासून पाऊस पडला नसल्यामुळे जमीन कोरडी आहे. दिवसभर प्रखर सूर्यप्रकाश जमिनीत शोषला जातो. रात्री जमिनीत शोषली गेलेली उष्णता उत्सर्जित होते, त्यामुळे उष्ण दिवसासह उष्ण रात्रीचा सामना करावा लागत आहे. पुढील दोन, तीन दिवस विदर्भ, मराठावाडा आणि तेलगांणात उष्णतेच्या लाटेचा अंदाज आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी दिली. गुरुवार, १२ मार्चपासून उत्तरेकडून हवेच्या स्तरातून मध्य भारताच्या दिशेने थंड वाऱ्याचा झोत येईल. त्याच दरम्यान बंगालच्या उपसागरावरून बाष्पयुक्त वाऱ्याचा जोर वाढेल, त्यानंतर पुढील आठवड्याच्या अखेरीस मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे. त्यानंतर तापमानात घट होऊन काही प्रमाणात दिलासा मिळेल, असा अंदाजही कश्यपी यांनी व्यक्त केला आहे.

# ३ कोटींचं एमडी जप्त

## अमरावतीत अंमली पदार्थांचं मोठं रॅकेट,

**▸विदर्भ केसरी। अमरावती :**

‘एमडी’ (मेफेड्रोन) या अमली पदार्थाच्या विक्रीसाठी शहरात येत असलेल्या दोघांना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. त्यांच्याकडून ३ कोटी १ लाख २० हजार रुपये किमतीची २ किलो ८० ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. ही कारवाई रविवारी ८ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील लालखडी-सुकळी मार्गावर करण्यात आली.

अब्दुल फहीम अब्दुल रहीम (२५) रा. आझादनगर, अमरावती व शेख अयान शेख रमजान (२०) रा. द्वारकानगर, अमरावती अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दोन तरुण हे रविवारी सायंकाळी एमडी ड्रग्ज विक्री करण्यासाठी लालखडी-सुकळी मार्गाने अमरावती शहरात येत असल्याची माहिती गस्तीवर असलेल्या गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पथकाने लालखडी-सुकळी मार्गावर सापळा रचून त्या दोघांना ताब्यात घेतले.चौकशीत त्यांनी आपली ओळख अब्दुल फहीम व शेख अयान अशी दिली. अंगझडतीत त्यांच्याजवळ २ किलो ८० ग्रॅम एमडी ड्रग्ज आढळून आली. त्यांच्याकडून सुमारे ३ कोटी १ लाख २० हजार रुपये किमतीची एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आली. त्यांच्याविरुद्ध नागपुरी गेट ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वातील पथकाने केली.

### यापुर्वीही ‘एमडी’चा साठा जप्त

- **महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) गेल्या काही महिन्यांपासून राज्यभरात विविध ठिकाणी कारवाई करून अमली पदार्थांचे साठे जप्त केले आहेत. या पदार्थांची किंमत हजारो कोटी रुपये आहे. याच मालिकेत ‘डीआरआय’च्या पथकाने अमरावतीत गेल्या महिन्यात सुमारे पाच किलो एमडी जप्त केले होते. या अमली पदार्थांची किंमत सुमारे ७.५ कोटी रुपये इतकी आहे.**

### मोठे रॅकेट सक्रिय...




- **अहमदाबादच्या डीआरआय पथकाने अमरावतीत घुसून ७.५ कोटी रुपये किमतीचे ५ किलो एमडी ड्रग्ज जप्त केले आणि चौघांना बेड्या ठोकल्या होत्या. विशेष म्हणजे, अटकेतील दोन आरोपी चक्क शहर पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत.**

**आता गुन्हे शाखेने नवीन कारवाई केली आहे. दोन महिन्यांपुर्वी वर्धा जिल्ह्यातील कारंजा तालुक्यात ‘डीआरआय’ने कारवाई करताना १२८ किलो एमडी जप्त केले होते. या कारवाईने अमरावतीत अंमली पदार्थाचे मोठे रॅकेट समोर येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

# सततच्या भांडणामुळा रागात पतीनं पत्नीच्या हत्येची दिली सुपारी

**▸विदर्भ केसरी। बुलढाणा :**

कवठळ परिसरात झालेला अपघात म्हणून समोर आलेल्या घटनेमागे भीषण कट दडला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. पतीनेच कट रचून शिक्षिका पत्नीचा घात केल्याचे उघड झाले. आरोपी पतीचा हा बनाव उघड झाल्याने परिसर हादरला आहे. संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा येथील महिला शिक्षिका वृषाली प्रकाश गावंडे (वय ३७) यांच्या मृत्यूचा प्रकार हा अपघात नसून त्यांच्या पतीनेच सुपारी देऊन घडवून आणलेला खून असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे.

मध्यस्थामार्फत दिली पत्नीच्या हत्येची सुपारी

या प्रकरणी पोलिसांनी मृत शिक्षिकेचे पती प्रकाश अनंता गावंडे (रा. पातुर्डा, तालुका संग्रामपूर, जिल्हा बुलढाणा ) तसेच धडक देणाऱ्या टाटा छोटा हत्ती मालवाहू वाहनाचा चालक मनीष नारायण सिंग सूर्यवंशी यांना अटक केली आहे. सुपारी देण्यामध्ये मध्यस्थी करणारा आरोपी मंगेश चौहूलकर (राहणार पातुर्डा, तालुका संग्रामपूर ) याचा शोध सुरू आहे. अटक आरोपींना ७ मार्च रोजी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना ९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वृषाली गावंडे या पिंपळगाव काळे येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. त्यांचे पती प्रकाश गावंडे यांच्याशी वारंवार वाद होत असल्याने त्यांनी संग्रामपूर पोलीस ठाण्यात कौटुंबिक छळाची तक्रारदेखील दिली होती.

दरम्यान ३ मार्च रोजी कवठळ परिसरात त्यांच्या स्कूटरला मालवाहू वाहनाने मागून जोरदार धडक दिल्याने त्या ठार झाल्याची माहिती समोर आली होती. सुरुवातीला हा अपघात असल्याचे भासवण्यात आले. मात्र मृतक शिक्षिकेचा भाऊ सुमित डोसे यांनी हा प्रकार संशयास्पद असल्याचे पोलिसांना सांगत घातपाताचा संशय व्यक्त केला. त्यानंतर जळगाव जामोद

# घरी जुळ्यांचे आगमन अन् वनरक्षकावर काळाचा घाला

## रस्त्यावरील खड्ड्याने घेतला बळी, आनंदी कुटुंबावर क्षणार्धात दुःखाचा डोंगर

**▸विदर्भ केसरी।**

रायगड जिल्ह्यातील रेवस-रेड्डी मार्गावर घडलेल्या भीषण अपघातात अलिबाग वनविभागातील वनरक्षक सुरज सारंगे यांचा मृत्यू झाला असून या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच त्यांच्या घरी जुळ्या बाळांचे आगमन झाले होते आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण असतानाच काही तासांतच दुर्दैवी घटना घडल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

मुरूड तालुक्यातील सर्वे गावचे रहिवासी असलेले सुरज सारंगे हे अलिबाग वनविभागाच्या तिनविरा येथे वनरक्षक म्हणून कार्यरत होते. शुक्रवारी



(६ मार्च) रात्री उशिरा ते आपल्या दुचाकीवरून घरी जात असताना रेवस-रेड्डी मार्गावर सुरू असलेल्या कामादरम्यान खोदून ठेवलेल्या खोल मोरीत त्यांची दुचाकी अचानक कोसळली. या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

शुक्रवारीच त्यांच्या जुळ्या बाळांना हॉस्पिटलमधून घरी आणण्यात आले होते. कुटुंबात नव्या पाहुण्यांच्या आगमनाचा आनंद साजरा होत असतानाच काही तासांतच झालेल्या अपघाताने संपूर्ण कुटुंब शोकसागरात बुडाले. सारंगे यांनी या आनंदाचा क्षण आपल्या मोबाईल स्टेटसवरही व्यक्त केला होता. दरम्यान, रेवस-रेड्डी मार्गावर सुरू असलेल्या कामादरम्यान खोदलेल्या खड्ड्याभोवती कोणतीही सुरक्षाव्यवस्था नसल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. त्या ठिकाणी बॅरिकेट्स, सूचना फलक, रेडियम पट्ट्या किंवा रात्री वाहनचालकांना दिसण्यासाठी लाल दिवे लावले नव्हते, अशी माहिती समोर येत आहे. या निष्काळजीपणामुळेच हा अपघात घडल्याचे सांगितले जात असून संबंधितांवर कारवाईची मागणी स्थानिकांकडून होत आहे. कर्तव्यदक्ष वनरक्षकाचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने वनविभागातही शोककळा पसरली आहे.

# गोठ्यात घुसला बिबट्या; तीन वासरांचा पाडला फडशा

**▸विदर्भ केसरी। रायगड**

कर्जत तालुक्यातील तुंगी गावात बिबट्याने अक्षरशः धुमाकूळ घालत एका रात्रीत तीन वासरांचा फडशा पाडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तुंगी गाव परिसरात शनिवारी रात्री बिबट्याने गोठ्यातील वासरांवर हल्ला करून त्यांना ठार केले. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. बिबट्याच्या सततच्या वावरामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या काही दिवसांपासून गाव परिसरात बिबट्याचे दर्शन होत असल्याची चर्चा होती. मात्र एका रात्रीत तीन वासरे ठार केल्याने ग्रामस्थांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी गावकरी घराबाहेर पडण्यास घाबरत असल्याचे चित्र आहे. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरा लावावा तसेच गावात गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# तरुणीवर आधी घरात, नंतर मुंबईत आणून केला बलात्कार

**▸विदर्भ केसरी।**

एक धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. मैत्रीचा गैरफायदा घेत एका १९ वर्षीय तरुणीचे अपहरण करून तिला आधी स्वतःच्या घरी आणि नंतर रेल्वेने मुंबईला आणून वारंवार बलात्कार करण्यात आला. ही घटना उघडकीस आल्यानंतर अमरावतीत खळबळ उडाली. ६ मार्च रोजी रात्री संशयित रितिक (रा. विलासनगर) याच्याविरुद्ध मारहाण, अत्याचार व अपहरणाचा गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. १० डिसेंबर २०२५ रोजीनंतर तरुणीवर अनेक बलात्कार केला गेला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि रितिक यांची एका मैत्रिणीमार्फत ओळख झाली होती. सुरुवातीला

# जूनपासून मुलींना शाळेतच मिळणार स्वसंरक्षणाचे धडे

## कमवा आणि शिका योजनेतून दरमहा 2 हजारही मिळणार, मंत्री पाटील यांची घोषणा

**▸विदर्भ केसरी।**

**येत्या जून महिन्यापासून मुलींना शाळेतच स्वसंरक्षणाचे धडे मिळणार असल्याची घोषणा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी केली. यावेळी त्यांनी कमवा व शिका योजनेतून विद्यार्थ्यांना दरमहा 2 हजार मानधन देण्याचीही घोषणा केली. त्यांच्या या घोषणेचा राज्यभरातील विद्यार्थ्यांना लाभ होण्याची शक्यता आहे.**

**जागतिक महिला दिनानिमित्त सांगलीत आज कन्या सबलीकरण उपक्रमांतर्गत मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. या उपक्रमांतर्गत कराटे प्रशिक्षण घेतलेल्या जवळपास 1 हजार मुलींना मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते यलो बेल्ट ग्रेड प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी बोलताना मंत्री पाटील म्हणाले, महिला सबलीकरणासाठी केवळ महिलांनीच नव्हे तर सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत सांगली जिल्ह्यात महिला सबलीकरणासाठी आम्ही एक नवा प्रयोग केला. त्यात 50 शाळांमधील 36 हजार मुलींना दर आठवड्याला शनिवारी 1 तास कराटे व ज्युडोचे प्रशिक्षण दिले. त्यातील 15 हजार 400 मुलींना आज आम्ही पहिला यलो बेल्ट दिला. त्या पुढचे बेल्ट मिळवण्यासाठी जे शुल्क द्यावे लागेल ते प्रशासन देईल.**

**येत्या जून महिन्यापासून प्रत्येक शाळेत मुलींना स्वसंरक्षणासाठी लाठ्याकाठ्याचे प्रशिक्षण मिळेल. सद्यस्थितीत राज्यातील विविध महाविद्यालयांत शिकणाऱ्या 5 लाख मुलींना सध्या कॉलेज फी लागत नाही. वसतिगृह शुल्क लागत नाही. याशिवाय त्यांना कमवा व शिका योजनेंतर्गत दरमहा 2 हजार रुपयांचे मानधनही देण्यात येईल, असे ते म्हणाले. यावळी खासदार विशाल पाटील यांच्यासह आमदार इद्रिस नायकवडी, जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांच्यासह इतर अधिकारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.**

**खासदार विशाल पाटील यांनी यावेळी मुलींचे मोफत सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण पाहून आपल्याला समाधान वाटत असल्याची भावना व्यक्त केली. मला दोन मुली आहेत. मुलींचे हे कराटे प्रशिक्षण पाहून माझे**




**म्हातारपण सुखरूप जाईल असा विश्वास वाटतो, असे ते म्हणाले. त्यांचे हे विधान ऐकून उपस्थितांत एकच हशा पिकला.**

# मध्यपूर्वेतील युद्धाचा फटका भारताच्या बळीराजाला:

**▸विदर्भ केसरी।**

इराण आणि इस्त्रायलमधील युद्धाचा परिणाम केवळ कच्च्या तेलाच्या किमतींपुरता मर्यादित न राहता, आता जगाच्या 'अन्न सुरक्षे'लाच मोठा धोका निर्माण झाला आहे. आखाती देशांमधून होणारा खत पुरवठा खंडित झाल्यामुळे जागतिक बाजारात खतांच्या किमती गगनाला भिडल्या असून, याचा सर्वाधिक फटका भारतासारख्या कृषीप्रधान देशाला बसण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक रोखली जाण्यापेक्षाही खत पुरवठा साखळीतील व्यत्यय अधिक धोकादायक मानला जात आहे. सौदी अरेबिया, कतार, ओमान आणि युएई हे देश युरिया, सल्फर आणि अमोनियाचे जागतिक स्तरावर सर्वात मोठे पुरवठादार आहेत. विशेषतः इराण हा जगातील तिसरा मोठा अमोनिया उत्पादक देश आहे. हे युद्ध लांबल्यास या देशांमधून होणारी खत वाहतूक ठप्प होईल, ज्याचा थेट परिणाम आगामी शेती हंगामातील धान्य उत्पादनावर होणार आहे.

- **भारताचे आयातीवर १०० टक्के अवलंबित्व**

भारत आपल्या खतांच्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणावर परदेशांवर अवलंबून आहे. आकडेवारीनुसार म्युरेट ऑफ पोटॅश १०० टक्के आयात होते. डीएपी ६० टक्क्यांपर्यंत आयात होते. भारत दरमहा सुमारे २० लाख टन खते आयात करतो. गेल्या आर्थिक वर्षात (२०२४-२५) केंद्र सरकारने खत अनुदानावर १.९ लाख कोटी रुपये खर्च केले होते. मात्र, युद्धा मुळे युरियाच्या किमतीत ३० ते ४० टक्क्यांनी वाढ झाल्यास सरकारवरील अनुदानाचा भार प्रचंड वाढणार आहे किंवा त्याचा भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावा लागणार आहे.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
सोमवार, ९ मार्च २०२६ | २

## अग्रलेख

# युध्दाचे परिणाम

इराण असो की इस्रायल, येमेन, इराक, सीरिया असोत... धर्मप्रभुत्वाच्या अपेक्षा आणि त्यातून होणारी युद्धे स्त्रियांनी लादलेली नसूनही सर्वाधिक झळा त्यांनाच... इस्रायल आणि अमेरिकेने इराणबरोबर चालवलेल्या युद्धात इराणच्या मिनाब शहरात एका शाळेवर टाकलेल्या मिसाइलमुळे १६० इराणी शाळकरी मुलींचा खात्मा झाला. होय, खात्माच, कारण त्या इस्रायल आणि अमेरिकेसारख्या शस्त्रसंपन्न देशांच्या एक प्रकारे शत्रूच होत्या. त्या मोठ्या होऊन आणखी इराणी नागरिकांना जन्माला घालणार होत्या. त्याआधीच इस्रायलआणि अमेरिकेने मिळून जन्माला येण्याआधीच आपल्या संभाव्य शत्रूंचा नायनाट करून टाकला. एवढ्या मोठ्या गोष्टीसाठी शंभर-दीडशे मुली मेल्या तर काय असे बिघडले? असे जगात पहिल्यांदा थोडेच घडले आहे? पुरुष पराक्रम गाजवणार आहेत म्हटल्यावर अपहरण, बलात्कार, हत्या या मार्गांनी स्त्रियांनीही बलिदान द्यायचेच असते, असे मानवी युद्धाचा इतिहास सांगतो. त्यांना विचारून कुणी युद्ध करत नाही, पण युद्ध म्हटले की सगळ्यात जास्त भरडल्या जातात त्या स्त्रिया आणि त्यांच्यासह लहान मुले. मात्र 'युद्धस्य कथा रम्या' म्हणणाऱ्यांच्या गोष्टींमध्ये त्यांना कणभरही जागा नसते हे समजण्यासारखे आहे. अर्थात स्त्रियांना भरडण्यासाठी प्रत्येक वेळी युद्ध थोडेच गरजेचे असते? अमेरिकेच्या 'अरे'ला 'कारे'ने उत्तर देणाऱ्या इराणमध्ये गेली कित्येक दशके तेथील स्त्रिया आणि तेथील पुरुषप्रधान व्यवस्था यांच्यादरम्यान युद्धच तर सुरू आहे. स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि मानवाधिकारांसाठी लढणाऱ्या शिरीन इबादी आणि नर्गिस मोहम्मदी या दोन इराणी स्त्रियांना अनुक्रमे २००३ आणि २०२३ या २० वर्षांत शांततेचा नोबेल पुरस्कार मिळणे ही बाबच तेथील स्त्रियांच्या स्थितीवर बोलके भाष्य करणारी आहे. सरकारच्या दबावामुळे शिरीन इबादी २००९ साली देशाबाहेर पडल्या. त्या युरोपमध्ये निर्वासित म्हणून राहतात, तर नर्गिस मोहम्मदी तुरुंगात आहेत. इराणी स्त्रियांचे राज्ययंत्रणेकडून शोषण गेली जवळपास ४० वर्षे सुरू आहे. त्यांच्या कपड्यांपासून प्रत्येक गोष्टीवर कायद्याने निर्बंध आहेत. सत्तेवर येताच ८ मार्च १९७९ रोजी आयातोल्ला खोमेनी यांनी महिलांनी सार्वजनिक जीवनात हिजाब परिधान करून चेहरा तसेच केस झाकले पाहिजेत असे आदेश दिले. त्याला इराणी स्त्रियांनी रस्त्यावर उतरून विरोध केला. तेव्हा आणि नंतरही अनेकदा केला. काहीच उपयोग झाला नाही. इराणमध्ये मुलीच्या नवव्या वर्षापासूनच अनेक प्रकारची बंधने लागू होतात. अलीकडे २०२२ मध्ये सार्वजनिक पातळीवर हिजाब घातला नाही म्हणून महसा अमीनी हिला कोठडीत डांबले. तिथेच दोन दिवसांत तिचा संशयास्पद मृत्यू झाला. त्याविरोधात 'विमेन लाइफ फ्रीडम' हे मोठे आंदोलन छेडले गेले, पण अत्यंत हिंसक पद्धतीने ते दडपले गेले. त्यानंतर हिजाबला विरोध करणाऱ्यांविरोधात २०२४ साली एक कडक कायदा आणण्यात आला. हिजाबच्या सक्तीला शांततामय आंदोलनाने विरोध करणाऱ्यांनाही त्यात मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. हा कायदा अजून लागू झालेला नसला तरी आधीचा कायदाही अन्याय्यच आहे. याशिवाय तिथे मुलीसाठी विवाहाचे किमान वय १३ वर्षे आहे. पुरुषांना सहज घटस्फोट घेता येतो, पण स्त्रियांना विशेष कारणे सिद्ध करावी लागतात. घटस्फोटानंतर मुलांचा ताबा वडिलांकडे जातो. त्यांना समान वारसा हक्क मिळत नाही. न्यायालयात एका पुरुषाची साक्ष ही दोन स्त्रियांच्या साक्षीसमान मानली जाते. पण इराणमध्येच ही परिस्थिती आहे, असे मानण्याचे कारण नाही. इराणवर युद्ध लादणाऱ्या इस्रायलमध्येही स्त्रियांचे जगणे फार चांगले आहे, असे नाही. तिथे कायद्याने स्त्री-पुरुष समानता असली, स्त्रियांना मतदानाचा अधिकार, शिक्षण, नोकरी, राजकारणात सहभाग हे अधिकार असले तरी धार्मिक कायद्यांच्या प्रभावामुळे त्यांना वेगळ्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते. विशेषत: विवाहाशी संबंधित प्रश्न यहुदी धार्मिक न्यायालयात सोडवले जातात. तिथे पुरुषाने घटस्फोट नाकारल्यामुळे ॲग्नॉट म्हणजे अडकलेल्या स्त्रियांची संख्या मोठी आहे. इस्रायली अतिकर्मठ समूहांमध्ये स्त्रियांनी सार्वजनिक ठिकाणी करायच्या पोशाखाचे कडक नियम आहेत, धार्मिक समारंभात वावरण्याबाबत विशिष्ट बंधने आहेत. 'फळा, फुला आणि वाढा' या धार्मिक संकल्पनेपायी 'जास्तीत जास्त मुले जन्माला घालणे' हे या समूहांमध्ये धार्मिक कर्तव्य समजले जाते. सर्वसामान्य ज्यू कुटुंबात दोन-तीन मुले असतील तर या अतिकर्मठ कुटुंबांमध्ये साताठ मुले. गर्भनिरोधके, गर्भपात या गोष्टींना त्यांचा धार्मिक पातळीवरच विरोध. त्यामुळे मुले जन्माला घालणे आणि वाढवणे यातच त्या स्त्रीचे सगळे आयुष्य संपते. असे आयुष्य तिला हवे आहे का, हे ठरवण्याचे स्वांतत्र्य तिला अर्थातच नसते. याशिवाय इस्रायलमध्ये स्त्रियांना त्याच कामासाठी पुरुषांच्या बरोबरीने समान वेतन दिले जात नाही. तिथे अपवाद वगळता सर्व स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने लष्करी सेवा सक्तीची आहे. पण त्यांना आजही लष्करातील सर्व पदे खुली नाहीत आणि लष्करात भरती होणाऱ्या स्त्रियांचा लैंगिक छळ ही तिथली नेहमीची बाब आहे. पश्चिम आशियातील तालिबान राजवटीत वावरणाऱ्या स्त्रियांची परिस्थिती काय आहे, हे वेगळे सांगायची गरज नाही. खरेतर जगातील सर्व महिलांमध्ये सर्वात जास्त शोषित आणि वंचित कोण असतील तर त्या अफगाण महिला, हे आजचे वास्तव. तालिबान पुन्हा सत्तेत आल्यानंतर २०२१ पासून तर तिथे इयत्ता सहावीनंतर मुलींना शाळेत जायलाच बंदी. त्यामुळे लाखो अफगाण त्रिरया शिक्षणापासून वंचित आहेत. तिथे मुलींचे लहान वयातच लग्न लावण्याचे प्रमाण वाढले आहे. पुरुष नातेवाईकाच्या सोबतीविना त्या घराबाहेर पडू शकत नाहीत. अर्थार्जन करणे दूरच.

# बच्चू कडूंच्या मेळघाट संघर्ष महापदयात्रेची निर्णायक आगेकूच

**▸विदर्भ केसरी। अकोला**



मेळघाटातील वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्न, आदिवासी बांधवांवर होणारा अन्याय आणि शासनाच्या उदासीनतेविरोधात सुरू असलेली माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वातील मेळघाट संघर्ष महापदयात्रा आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली असून उद्या चिखलदरा येथे हजारो आदिवासी बांधवांच्या उपस्थितीत तहसिलवर जोरदार 'तांडव आंदोलन' होणार आहे.

या आंदोलनामुळे संपूर्ण प्रशासन यंत्रणा सतर्क झाली असून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मेळघाटातील दुर्गम गावांमधून पायी चालत निघालेल्या या संघर्ष यात्रेला आदिवासी समाजाचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही मूलभूत प्रश्न सुटत नसल्याने आता थेट आंदोलनाच्या माध्यमातून शासनाला जागे करण्याचा निर्धार बच्चू कडूंनी व्यक्त केला आहे.

आज ८ व्या दिवशी काटकुंभ येथून निघालेली महापदयात्रा बामादेही, डोमा आणि काजलडोह या गावांमधून पुढे सरकत सलोना येथे दाखल झाली. मार्गातील प्रत्येक गावात आदिवासी बांधवांनी संघर्ष यात्रेचे जल्लोषात स्वागत करत आपल्या समस्या बच्चू कडूंसमोर मांडल्या.सलोना येथे आज यात्रेचा मुक्काम राहणार असून उद्या सकाळी हजारो आदिवासी बांधवांसह ही महापदयात्रा थेट चिखलदऱ्याकडे कूच करणार आहे.

या वेळी मेळघाटातील विविध गावांमधून मोठ्या संख्येने लोक आंदोलनात सहभागी होणार असल्याचे सांगितले जात आहे.

### जिल्हास्तरावरील प्रश्न मार्गी; आता शासनस्तरावर लढाई

**■ या महापदयात्रेदरम्यान अनेक गावांमधील पाणी, रस्ते, आरोग्य सुविधा, वीज, शिक्षण आणि रोजगारासारख्या जिल्हा पातळीवरील अनेक प्रश्नांवर प्रशासनाकडून तातडीने निर्णय घेण्यात आले. मात्र मेळघाटातील काही महत्त्वाचे प्रश्न अजूनही शासनस्तरावर प्रलंबित असल्याने त्यासाठी आता चिखलदरा येथे ठीय्या आंदोलन करण्यात येणार आहे.बच्चू कडू यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की,"मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या प्रश्नांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष झाले आहे. आता आम्ही थांबणार नाही. शासनाने ठोस निर्णय घेतला नाही तर चिखलदरा येथील आंदोलन अधिक तीव्र होईल."**

# मास्टरमाईंड 'बंटी-बबली' अटकेत

**▸विदर्भ केसरी। दिग्रस,**

जादा परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गाजत असलेल्या 'ग्रो कॅपिटल' आर्थिक घोटाळ्यात अखेर मोठी कारवाई झाली आहे.

या प्रकरणातील मास्टरमाईंड म्हणून ओळखले जाणारे पुष्पांजली दिनेश आणि मनोज अशोक पाटील उर्फ बंटी-बबली यांना अटक करण्यात पुसद पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या दोघांची न्यायालयात हजेरी लावल्यानंतर त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून या अटकेमुळे प्रकरणाच्या तपासाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दिग'स शहरात जादा परताव्याचे आमिष दाखवत सात जणांच्या टोळीने तब्बल ७ कोटी लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. शिक्षक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करून ही फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात आधीच दिग'स येथील केंद्रप्रमुख गिरीश दुधे, त्याचा भाऊ शिक्षक विनोद दुधे आणि गिरीश दुधेचा मुलगा मंदार दुधे यांना अटक झाली असून ते सध्या यवतमाळ कारागृहात आहेत. तपासादरम्यान संपूर्ण जाळ्यामागे विश्वांजली आणि ग्रो कॅपिटल या कंपन्यांचे कथित मालक पुष्पांजली रंधेरिया आणि मनोज पाटील यांचा प्रमुख हात असल्याची माहिती समोर आली. बंटी-बबली या चित्रपटाच्या धर्तीवर या दोघांनी एक टीम तयार करून सर्वसामान्य नागरिकांना जादा परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप आहे.

माहितीनुसार, येथील गिरीश दुधे हा दोघांच्या संपर्कात आला आणि कमिशनच्या आमिषाला बळी पडला. त्याच्या माध्यमातून अनेकांनी गुंतवणूक केली. मात्र आतापर्यंत केवळ ३७ गुंतवणूकदारांनी पोलिसांकडे अधिकृत तक'ार नोंदवली आहे. या आर्थिक घोटाळ्याचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक रवी चव्हाण, सुनील मदने, पंकज पातुरकर, राहुल मडावी व पुसद पोलिस गेल्या दोन महिन्यांपासून करीत दरम्यान, मु'य सूत्रधार समजल्या जाणाऱ्या बंटी-बबली जोडीच्या अटकेमुळे तपास अधिक वेगाने पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणात अजून काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने आता पोलिस पुढे कोणती कारवाई करतात आणि गुंतवणूकदारांना न्याय कसा मिळतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वाळु तस्करांवर कारवाईचा बडगा

**▸विदर्भ केसरी। राळेगाव,**

यंत्रणेच्या नाकावर टिच्चून राळेगाव तालुक्यातील रोहिणी घाटावर राजरोस अवैध वाळू उपसा करणाऱ्यांना पांढरकवडा उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या दणका दिला.

या धाडीत शनिवार, ७ मार्चच्या मध्यरात्रीनंतर १.३० वाजता छापा टाकून २० जणांना अटक करण्यात आली. यावेळी ११ टिप्परसह २ बोटी, २ पोकलँड मशीन असा एकूण १ कोटी ४२ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या कारवाईमुळे तालुक्यातील रेती तस्करांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.



राळेगाव तालुक्यातील येथील वर्धा नदीच्या पात्रातून विनापरवाना वाळूचे उत्खनन करून गौणखनिजाची चोरी करीत असल्याची गोपनीय माहिती पांढरकवडा उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बन्सल व त्यांच्या पथकाने रोहिणी घाटावर छापा टाकला. या कारवाईत ११ टिप्परसह २ बोटी, २ पोकलँड मशीन असा एकूण १ कोटी ४२ ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हा अवैध वाळूसाठा आणि उत्खनन व वाळू वाहतुकीकरिता वापरलेली वाहने जप्त करून वडकी पोलिस ठाण्यात लावण्यात आली आहेत. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता आणि अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या पथकाने यशस्वी केली

# अकोल्यात देशातील सर्वाधिक 40.9 सेल्सीअस तापमानाची नोंद

**▸विदर्भ केसरी। अकोला**

देशाच्या हवामानात सध्या मोठे बदल पाहायला मिळत आहेत. एकीकडे उत्तर भारतात, विशेषतः जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात सरासरीपेक्षा 5 ते 8 अंश सेल्सिअस जास्त तापमानाची नोंद होत आहे, तर दुसरीकडे विदर्भातही उन्हाचा चटका तीव्र झाला आहे.

अकोला येथे आज देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद करण्यात आली.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, 10 मार्चपर्यंत वायव्य भारतातील मैदानी भागात तापमान सामान्यपेक्षा 3 ते 5 अंशांनी जास्त राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर तापमानात 2 ते 3 अंशांची घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

विदर्भासाठी चिंतेची बाब म्हणजे, येथे उष्णतेच्या लाटेची परिस्थिती निर्माण झाली आहे. काल अकोला येथे देशातील सर्वाधिक 40.8 अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले होते. आज, 8 मार्च रोजी अकोल्याचे कमाल तापमान 40.9 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले असून किमान तापमान 19.2 अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले आहे. विदर्भातील इतर भागांतही तापमान 35 ते 40 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. अकोल्यानंतर नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्येही उच्च तापमानाची नोंद झाली आहे. हवामान खात्याने विदर्भात 8 ते 12 मार्च दरम्यान उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. दरम्यान, 9 ते 11 मार्च दरम्यान नवीन 'वेस्टर्न डिस्टर्बन्स' सक्रिय होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या प्रणालीमुळे पश्चिम हिमालयीन प्रदेशात - जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये - विखुरलेला हलका पाऊस किंवा बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. तसेच 10 ते 12 मार्च दरम्यान जम्मू-काश्मीरमध्ये पावसाचा जोर वाढू शकतो. या काळात गडगडाट आणि ताशी 30 ते 50 किमी वेगाने वाहणाऱ्या वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# महसूलचे 'डोळे झाक' अन् माफियांचे 'पाकीट' गरम

## गोडपिपरी तालुक्यात रॉयल्टीविना रेतीची लूट!

## रेती घाटाच्या नावाखाली शासनाच्या तिजोरीवर दरोडा; पोकलेनने नदीपात्र ओरबाडणे सुरूच




**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड -:**

शासनाने रेती घाटांचे लिलाव केले ते पारदर्शक व्यवहारासाठी, मात्र गोडपिपरी तालुक्यात सध्या उलटी गंगा वाहताना दिसत आहे. 2025-२६ या वर्षासाठी लिलाव झालेल्या परवानाधारक रेती घाटातूनच आता 'ओपन' लूट सुरू झाली आहे. कोणतीही अधिकृत रॉयल्टी न भरता, केवळ घाट मालकाच्या खिशात २५,००रुपये (अडीच हजार रुपये प्रति ब्रास) टाकले की नदीपात्रातून थेट ट्रकमध्ये रेती लोड करून दिली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नियम सांगतो की, रेतीचा उपसा मर्यादित आ णि ठराविक पद्धतीने व्हावा. मात्र, येथे परवानाधारक मालकच स्वतः मा फिया बनले आहेत. रात्रंदिवस पो कलेन मशीनच्या सहाय्याने नदीपात्र ओर बा डले जात आहे. एका हायवा ट्र क मध्ये १० ब्रास रेती भरली जाते. को णत्याही शासकीय पावतीशिवाय (रॉयल्टी) एका ट्रकमागे घाट मालक २५ हजार रुपये कमावत आहे. दिवसाला १० ते १५ ट्रक एकाच घाटातून काढले जात असून, दररोज लाखो रुपयांचा महसूल बुडवून माफियांचे घर भरले जात आहे.

### महत्त्वाचे मुद्दे:

**■ रॉयल्टीचा पत्ता नाही: शासनाच्या तिजोरीत एक रुपया न भरता अवैध विक्री.**
**अवजड यंत्रांचा वापर: नियमांना हरताळ फासत पोकलेनचा वापर.**
**आर्थिक फटका: दिवसाकाठी शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान.**
**कर्मचाऱ्यांचे साटेलोटे: गस्ती पथकांकडून रेती तस्करांना अभय.**

**■ जनतेचा सवाल: साहेब, कारवाई कधी होणार?**

**■ सामान्य माणसाला घरकुलासाठी रेती हवी असल्यास नियमांचा डोंगर उभा केला जातो, मग या धनदांडग्या घाट मालकांना पोकलेन लावून रेती चोरण्याची मुभा कोणी दिली? असा सवाल जनता विचारत आहे. वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यास, हे अधिकारीही या लुटीत सामील आहेत का? असा संशय बळावत आहे. आता या 'रेती चोरांवर' आणि त्यांना साथ देणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर जिल्हाधिकारी काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

### ■ प्रशासनाची 'सोयीस्कर' डोळेझाक?

सर्वात संतापजनक बाब म्हणजे, हा सर्व प्रकार उघडपणे सुरू असताना वरिष्ठ अ धिकारी मात्र गप्प आहेत. रात्रीच्या सुमारास हे ओव्हरलोड ट्रक तालुक्यात जा गोजागी रिकामे होतात. गस्तीवर अस लेले कनिष्ठ कर्मचारी या ट्रकांना पाहूनही 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष करत असल्याची चर्चा आता तालुक्यात रंगत आहे.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## घरात घुसून जीवे मारण्याची धमकी

यवतमाळ : तिघांनी घरात घुसून बापलेकाला जीवे मारण्याची धमकी दिली. हा प्रकार पुसदच्या सुदर्शननगरात ४ मार्च रोजी घडला. विरेंद्र ठाकूर (४५), प्रशांत विरेंद्र ठाकूर (२५) आणि देवा विरेंद्र ठाकूर (२३) हे तिघेही मधुकर धर्मा राठोड (६०) रा. सुदर्शन नगर यांच्या घरात शिरले. तुमचा मुलगा कुठे आहे असे म्हणत त्यांनी वाद घातला व मारहाण केली. त्यानंतर मधुकर राठोड व त्यांच्या मुलाला जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी मधुकर धर्मा राठोड यांच्या तक्रारीवरुन वसंतनगर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### महत्त्वाचे



## जागतिक महिला दिनानिमित्त लोही येथे महिला ग्रामसभा; विधवा महिलांचा सन्मान

**विदर्भ केसरी। दारव्हा प्रतिनिधी**

लोही : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लोही ग्रामपंचायतीच्या वतीने महिला ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. महिलांच्या सन्मान आणि सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन गावातील महिलेच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रामपंचायत सरपंच संजय शिंदे आणि ग्रामविकास अधिकारी विद्याधर चौधरी यांच्या हस्तेही प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ग्रामसभेची सुरुवात करण्यात आली. महिला ग्रामसभेत समाजातील विविध अडचणींना तोंड देत स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभ्या राहिलेल्या विधवा महिलांचा सन्मान करण्यात आला. श्रीमती चंद्रकला अवधूत तायडे आणि श्रीमती रत्नकला संतोष पराडे या महिलांना शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या जिद्दीचे आणि संघर्षमय जीवनाचे उपस्थितांनी कौतुक केले. या कार्यक्रमाला लोही ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजू हळदे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला दिनानिमित्त आयोजित हा उपक्रम महिलांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या कार्याचा गौरव करणारा ठरला. उपस्थितांनी अशा कार्यक्रमांमुळे महिलांना प्रोत्साहन मिळते आणि समाजात सकारात्मक संदेश जातो, अशी भावना व्यक्त केली.




## कृषि उद्यमी प्रशिक्षणार्थी महिलांना साजरा केला जागतिक महिला दिन

**विदर्भ केसरी। प्रतिनिधी :विठ्ठल भागवत**

मेडशी ग्रामपंचायत कार्यालयात तसेच पोलीस चौकी येथे आज उमेद प्रभागसंघ व कृषी उद्योगिनी प्रशिक्षणार्थी महिलांनी दि 8 मार्च रोजी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून जागतिक महिला दिन साजरा केला.कारण सामर्थ्य,सन्मान आणि स्वाभिमानाची ओळख असलेल्या सर्व महिला भगिनींना जागतिक महिला दिनाच्या मनस्वी शुभेच्छा देताना स्त्री म्हणजे प्रभुत्व, मातृत्व, कर्तृत्व आणि दातृत्वाचा अनोखा संगम आहे. स्त्री म्हणजे माँसाहेब जिजाऊंचा संयम आहे,स्त्री म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा स्वाभिमान आहे,स्त्री म्हणजे ज्ञानज्योती सावित्रीबाईंची क्रांती आहे.त्यामुळे आजच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने, विविध सामाजिक क्षेत्रांत अतुलनीय योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिला भगिनींच्या कार्यकर्तृत्वाला सलाम व अवघ्या नारीशक्तीला जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या या वेळी गावातील सक्षम व कर्तुत्वान महिलांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे एका चिमुकलीला पुष्पगुच्छ देऊन तिचा सुद्धा सत्कार करण्यात आला. आजच्या या जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाला मेडशी परिसरातील कर्तुत्वान महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पिएम श्री.स्व अहेमद ऊल्लाह खान न.प. उर्दु प्राथमिक शाळेत महिला दिन उत्साहात

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी**




पि एम श्री.स्व. अहेमदउल्लाह खान न.प. उर्दु उच्च प्राथमिक शाळा क्र.३ येथे जागतिक महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित शाळेत एका शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मुख्याध्यापक अब्दुल हमीद मनियार यांनी महिला शक्ती या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. संचालन मसर्रत शिरीन यांनी केले, तर आभार हुमेरा नाजनीन यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सय्यदा शबाना,अली बुशरा , आस्मा आफरीन, शिरीन खानम, यांनी परिश्रम घेतले.

# संघर्षमय आयुष्याला सन्मानाचा मुकुट

## रोहिणी फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद : खासदार बळवंत वानखडे यांचे प्रतिपादन

**विदर्भ केसरी। दर्यापूर (तालुका प्रतिनिधी):**





कष्टकरी ज्येष्ठ महिलांचा सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करणे हे अत्यंत कौतुकास्पद सामाजिक कार्य असून अशा उपक्रमांमुळे समाजात प्रेरणा निर्माण होते, असे प्रतिपादन अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी केले. ते रोहिणी फाउंडेशन दर्यापूरतर्फे आयोजित सत्कार सोहळ्या प्रसंगी बोलत होते.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रोहिणी फाउंडेशन दर्यापूरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही कष्टकरी ज्येष्ठ महिलांचा विशेष सत्कार कार्यक्रम त्यांच्या घरी जाऊन आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान फाउंडेशन चे अध्यक्ष किशोर ठाकूर यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून खासदार बळवंत वानखडे यांची उपस्थिती होती . तसेच फाउंडेशनचे मार्गदर्शक गजानन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी दर्यापूर शहरातील कष्टकरी, विधवा व समाजात आपल्या कर्तृत्वाने वेगळा लौकिक मिळवलेल्या महिलांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये श्रीमती अलका अशोकसिंह गहरवार, श्रीमती लक्ष्मीबाई गोपालसिंह बयस, श्रीमती शालू नरेश कंटाळे, श्रीमती देवांगना नरेश धानिस्कर, श्रीमती कांताबाई रामचंद्र तायडे, श्रीमती कृष्णाबाई श्रीराम पवार, श्रीमती वैशाली नंदू सावळे तसेच श्रीमती जूलेखाबाई जिक्करभाई घाणीवाले यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव निलेश पारडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष संतोष मिसाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर ठाकूर, संतोष मिसाळ,अमोल कंटाळे निलेश पारडे, सौ. रितिका देशमुख, स्नेहल धानिस्कर, वैभव देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, हा सत्कार सोहळा पाहून काही महिलांच्या डोळ्यांत अक्षरशः आनंदाश्रू तरळले. विशेष म्हणजे त्यांच्या सुनबाईंच्या उपस्थितीत हा सन्मान करण्यात आला, तसेच कष्टकरी सुनबाईंसमोर त्यांच्या सासूंचाही गौरव करण्यात आल्याने कार्यक्रमाला भावनिक स्पर्श लाभला.

## पदवीदान समारंभ उत्साहात

**विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रतिनिधी:-विरेंद्र चव्हाण**

कळंब :संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिसूचनेनुसार इंदिरा महाविद्यालयात पदवीदान समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य डॉ. मार्तंड खुपसे उपस्थित होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. सरोज लखदिवे, डॉ. माधुरी राखुंडे, डॉ. दशरथ चव्हाण, डॉ. प्रशांत जवादे आणि प्रा. निळकंठ नरुले यांची उपस्थिती लाभली. या पदवीदान समारंभात बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी. तसेच एम.ए., एम. कॉम. आणि एम.एस्सी. या अभ्यासक्रमातील यशस्वी विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. पदवी स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमानाचे भाव दिसून येत होते.डॉ. मार्तंड खुपसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाच्या जोरावर समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे आवाहन केले. तर अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांनी विद्यार्थ्यांना आयुष्यात यशस्वी होण्यासाठी परिश्रम, चिकाटी आणि प्रामाणिकपणा या मूल्यांचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. निळकंठ नरुले यांनी, सूत्रसंचालन प्रा. स्नेहल खांडेकर यांनी तर समारंभाच्या शेवटी डॉ. सुरज देशमुख यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.या पदवीदान समारंभास महाविद्यालयातील डॉ. पांडुरंग इंगळे, डॉ. शरयू बोंडे, डॉ. प्राची बोंडे, डॉ. विकी वाटकर, प्रा. रूपेश आत्राम, प्रा. सखाराम सांगळे व श्री. विशाल कोदाने,श्री. सचिन धोबे, श्री. विशाल टाकळे, श्री. नरेश कोकांडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोंडपिपरी येथे 'शिवाजी महाराजांच्या समाधान शिबिरा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ केसरी। गोंडपिपरी:**



छ त्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवाचे औचित्य साधून, गोंडपिपरी तहसील अंतर्गत 'माझा भंगार' येथे भव्य महाराज्व 'समाधान शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय अधिकारी मा. लघिमा तिवारी मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या शिबिरात शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट जनतेच्या दारी पोहोचवण्यात आला. विशेष म्हणजे, जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित या शिबिरात महिलांच्या आरोग्य तपासणीला प्राधान्य देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार शु भम महाकाल यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी प्र शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. या शिबिराचे मुख्य आकर्षण महिला आरोग्य तपासणी शिबिर ठरले, ज्यामध्ये परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संपूर्ण शिबिरात अंदाजे १,२०५ लाभार्थ्यांनी हजेरी लावून विविध शासकीय सेवांचा लाभ घेतला. शिबिरादरम्यान विविध विभागांच्या व तीने लाभार्थ्यांना प्रत्यक्ष प्रमाणपत्रांचे आणि आदेशांचे वितरण करण्यात आले.

या सोहळ्याला प्रशासकीय अ धिकाऱ्यांची मोठी फौज उपस्थित होती. यामध्ये प्रामुख्याने गटविकास अ धिकारी पुल्लमवार, तालुका आरोग्य अधि कारी डॉ. जावळे, भूमी अभिलेख उपअ धीक्षक वराडे साहेब, तसेच सर पं च भंगाराम तळोधी प्रशासकीय अधि कारी आणि परिसरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- "शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी नागरिकांना कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, हाच या महाराजस्व समाधान शिबिराचा मुख्य उद्देश आहे."
  -तहसीलदार गोंडपिपरी.
- या शिबिरामुळे नागरिकांच्या अनेक प्रलंबित कामांचा निपटारा एकाच ठिकाणी झाल्याने ग्रामस्थांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

## जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीशक्तीचे दर्शन

### चिमुकल्यांनी साकारली महानायिकांच्या भूमिकेत वेशभूषा

**विदर्भ केसरी। मंगरूळपीर:**



येथून जवळच असलेल्या श्री गोविंद विद्यालय पार्डी ताड येथे विविध महानायिकांच्या भूमिकेत विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावशाली वेशभूषा साकारली. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विद्यालयामध्ये महानायिकांच्या भूमिकेतील अशी स्त्री जिने आपल्या कार्याने, शौर्याने, गुणांनी समाजात एक अफाट आदर्श निर्माण केला अशा महान स्त्रियांच्या वेशभूषेचे आयोजन विद्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ शिक्षक सदानंद ठाकरे तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक शामराव ठाकरे लाभले. जागतिक महिला दिनानिमित्त राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या भूमिकेत दिपाली ठाकरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या भूमिकेत गायत्री पातळे, राणी लक्ष्मीबाई यांच्या भूमिकेत ईश्वरी कुरवाडे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत अनुष्का भगत, दिवंगत मा. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत गौरी कुरवाडे, मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या भूमिकेत हर्षदा सावके, दिवंगत गायिका लता मंगेशकर यांच्या भूमिकेत सानिका पानभरे, महिला आर्मी कॅप्टन प्रीती रजक च्या भूमिकेत नंदिनी गावंडे, पोवाडा क्षेत्रात शाहिरी बाणा गाणारी महिला विनाता जोशी यांच्या भूमिकेत श्रद्धा लांभाडे, क्रिकेटपटू मिताली राज च्या भूमिकेत मोहिनी बोथे, कुस्तीपटू साक्षी मलिक च्या भूमिकेत गायत्री सावके, बॅडमिंटनपटू सायना नेहवाल च्या भूमिकेत शितल लांभाडे, गिटार वादक कमला शंकर च्या भूमिकेत अंकिता गावंडे यांनी प्रभावीपणे वेशभूषा साकारली. त्यानंतर वेशभूषा धारण केलेल्या विद्यार्थ्यांनी महान आदर्श कर्तुत्वान शौर्य गाजविणाऱ्या स्त्रियांच्या कार्याविषयी माहिती दिली. आजच्या महिलादिनी सहाय्यक शिक्षिका मीना नानुटे, व शोभाताई कुरवाडे यांचा पुष्पगुच्छ देऊन मुख्याध्यापक शामराव ठाकरे यांनी सन्मान केला. यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विद्यालयाचे मुख्याध्यापक शामराव ठाकरे यांनी दररोज घरातील महिलांचा सन्मान करणे म्हणजेच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा करणे होय असे प्रतिपादन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष सदानंद ठाकरे यांनी कर्तुत्वान महिलांचा आदर्श आत्मसात करण्याची तसेच स्त्रीभ्रूणहत्या टाळण्याची गरज असल्याचे मनोगत व्यक्त केले. यानंतर जगदीश गावंडे, मीना नानुटे, आकाश ठाकरे, महादेव बोरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करून झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश गावंडे, यांनी तर प्रास्ताविक गोपाल गावंडे व आभार प्रदर्शन अनेश मस्के यांनी केले.

## दोन महिलांनी जीव गमावला

**विदर्भ केसरी। नागपूर :**

काटोल तालुक्यातील राऊळगाव येथील 'एसबीएल कंपनी लिमिटेड'मध्ये १ मार्च रोजी झालेल्या भीषण स्फोटातील जखमींच्या मृत्यूचे सत्र सुरूच आहे. उपचाराखाली असलेल्या दोन जखमी महिलांचा मृत्यू झाला. मृतांची संख्या आता २२ वर पोहोचली असून, सध्याच्या स्थितीत ऑरेंज सिटी हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे १४ महिला उपचार घेत आहेत. एक आठवडा होऊनही यातील काही रुग्णांची प्रकृती अजूनही चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते.

आम्रपाली कालसर्पे (३६) यांचा उपचारादरम्यान ७ मार्च रोजी रात्री ११ वाजताच्या दरम्यान मृत्यू झाला. त्या ५५ टक्के जळल्या होत्या. त्या पहिल्या दिवसापासून व्हेंटिलेटरवर होत्या. तर, तर रोशनी सुर्यकांत उमाठे (३२) यांचा ८ मार्च रोजी सकाळी मृत्यू झाला. त्या ७५ टक्के जळाल्या होत्या. त्यांच्या हाताला गंभीर फ्रॅक्चर होते, पायावरवर शस्त्रक्रिया करून 'एक्सटर्नल फिक्सेशन' करण्यात आले होते. सध्या गंभीर रुग्णांमध्ये सुजाता विनायक रक्षीत (३५) व सीमा विजय धुर्वे (२७ वर्षे) दोन्ही ७० टक्के, ज्योती शामू धुर्वे (२१ वर्षे) ६५ टक्के जळाल्या असून या तीन्ही रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याचे बोलले जाते. सध्या ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या दुर्गा मनोज घाटगे ६० टक्के, उषा बालाजी रेवतकर ५० टक्के, मयुरी धुर्वे ४५ टक्के, मनीषा धुर्वे ४५ टक्के, काजल कोरती व रितू सलाम प्रत्येकी ४० टक्के, कविता उईके ३५ टक्के, सुनीता उईके ३० टक्के आणि वैशाली धुर्वे १५ टक्के जळाल्या असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## रिसोडमध्ये रणरागिणींचा एल्गार! 'स्त्री भ्रूणहत्या थांबवा, लेक वाचवा, देश वाचवा'

### विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठानचा पुढाकार

**विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी-प्रदिप खंडारे**




"मुलगा-मुलगी एकसमान, दोन्हींना द्या सन्मान," "आई पाहिजे,पत्नी पाहिजे,मग मुलगी का नको?"अशा गगनभेदी घोषणांनी आज रिसोड शहर दुमदुमून गेले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठान,रिसोड च्या वतीने स्त्री भ्रूणहत्ये सारख्या सामाजिक कलंकाविरुद्ध जनजागृती करण्यासाठी एका भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी शेकडो महिलांनी रस्त्यावर उतरून 'लेक वाचवा'देश वाचवा,चा नारा देत समाजाचे डोळे उघडण्याचे काम केले.आजच्या आधुनिक युगातही स्त्री भ्रूणहत्येचे प्रमाण चिंताजनक आहे.विज्ञानाने प्रगती केली असली,तरी मानवी मानसिकता अजूनही स्त्री जन्माचे स्वागत करण्यास कचरत आहे.हिच बाब लक्षात घेऊन विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठानने महिला दिनाचे औचित्य साधून केवळ सत्कार समारंभ न ठेवता,थेट समाजातील ज्वलंत प्रश्नाला हात घातला.८ मार्च रोजी आयोजित या कार्यक्रमात उपस्थित महिलांनी स्त्री जन्माचे स्वागत करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाचे नेतृत्व करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदिप खंडारे यांनी आपल्या भाषणात अत्यंत बेधडकपणे आपली मते मांडली. ते म्हणाले की,"स्त्री ही सृष्टीचा आधार आहे.जर मुलगीच जन्माला आली नाही, तर भविष्यात समाजाचा समतोल बिघडल्या शिवाय राहणार नाही.स्त्री भ्रूणहत्या हा केवळ गुन्हा नाही, तर तो माणुसकीला लागलेला कलंक आहे.हा कलंक पुसण्यासाठी पुरुषांनी आपली मानसिकता बदलणे गरजेचे आहे."यावेळी उपस्थित संस्थेचे सदस्य जियाउर खान, मंदाताई धांडे, कांताबाई मोरे, सिंधुबाई कळंबे, अर्चना वाघमारे, मंदाबाई कळासरे, कासुबाई पंडित, लक्ष्मीबाई मोरे, सुनीताबाई कांबळे, सुशीला वानखेडे, कुसुम साबळे,व महिला उपस्थित होत्या

## गावासाठी महिला रणरागिनी सरसावल्या

### देशी दारू दुकान व वाईनबार बंद करण्यासाठी महिलांची ठाम भूमिका

**विदर्भ केसरी। शेरखान पठान**



महागाव : शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील कै. वसंतरावजी नाईक यांच्या तैलचित्राजवळ सुरू असलेले देशी दारू दुकान (सीएल-३ क्र. ७९) तसेच बाजूला सुरू असलेले बैठक वाईनबार तात्काळ बंद करण्यात यावे, या मागणीसाठी प्रभागातील महिला नागरिकांनी एकजूट दाखवत प्रशासनाकडे निवेदन दिले असून या मागणीची पडताळणी प्रक्रिया शनिवारी (दि. ७ मार्च) पार पडली. प्रभाग क्रमांक १ मधील समस्त महिला नागरिकांनी दि. २३ जानेवारी २०२६ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे निवेदन सादर केले होते. हे निवेदन दि. २७ जानेवारी २०२६ रोजी कार्यालयास प्राप्त झाले. त्यानंतर मा. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ यांच्या दि. २५ फेब्रुवारी २०२६ च्या पत्रानुसार निवेदनातील महिलांच्या सह्यांची पडताळणी करण्यासाठी दि. ७ मार्च २०२६ रोजी सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, महागाव येथे सकाळी ११ वाजता पडताळणी प्रक्रिया आयोजित करण्यात आली.

या वेळी प्रभागातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली भूमिका स्पष्ट केली. निवेदनावर एकूण ५० महिलांच्या सह्या असून त्यापैकी दुपारी एक वाजेपर्यंत ४१ महिलांच्या सह्यांची पडताळणी पूर्ण झाली. सायंकाळी पाच वाजेपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली. गावातील सामाजिक वातावरण बिघडू नये, तसेच शाळा व सार्वजनिक ठिकाणांच्या परिसरात दारूविक्री होऊ नये, या उद्देशाने महिलांनी ही भूमिका घेतली आहे.

गावाच्या हितासाठी महिलांनी एकत्र येत उचललेले हे पाऊल सध्या महागावमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. या पडताळणी प्रक्रियेवेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक, पुसद यांनी उपस्थित राहून सह्यांची तपासणी केली.

## थुंकण्याच्या कारणावरुन बापलेकाला मारहाण

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

इथे थुंकू नको असे म्हणत बापलेकाला मारहाण केल्याची घटना राळेगाव तालुक्यातील वरध येथे ६ मार्च रोजी घडली. अनंता चंपत बुध्देवार (५२), राजू चंपत बुध्देवार (५४) आणि संचीत राजू बुध्देवार (२१) या तिघांनी मारहाण केल्याची तक्रार दीपक श्रीधर अक्कलवार (५८) रा. वरध यांनी दाखल केली आहे. त्यावरुन वडकी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान याच घटनेत अनंता चंपत बुध्देवार (५२) यांनीही वडकी पोलिसात तक्रार दाखल केली. त्यानुसार दीपक श्रीधर अक्कलवार, राकेश दीपक अक्कलवार यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरुन पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

### महत्त्वाचे



## जागतिक महिला दिन तालुक्यात विविध ठिकाणी संपन्न.

**▸विदर्भ केसरी। मानोरा :--**

शहर व तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटविणाऱ्या माता भगिनीच्या कार्याचा गौरव विविध कार्यक्रमांचे आयोजन करून करण्यात आला.

मानवी जीवनाच्या विकासामध्ये पुरुषासोबत महिलांचा सहभाग सुद्धा समान असून आजच्या युगात सर्व बाबतीत महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन सर्व क्षेत्रात अग्रेसर असल्यामुळे जागतिक पातळीवर आजचा दिवस महिलांसाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने साजरा केला जातो. कारपा येथे मार्च जागतिक महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कारपा आणि क्रांतिवीर महिला ग्रामसंघ कारपा यांच्या संयुक्त विचाराने जागतिक महिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला त्याकरीता गावामधील महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच राजू मनवर तर प्रमुख अतिथी म्हणून आनंद खुळे,पंकज चव्हाण उपसरपंच,विलास चव्हाण राजू राठोड , रंजीत चव्हाण ,महेश चव्हाण समाधान भाऊ, क्रांतिवीर महीला ग्रामसंघाचे अध्यक्ष मनिषा खुळे, सचिव छाया राठोड, वरिष्ठ सिआरपी अर्चना चव्हाण,सुरेखा राठोड उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज चव्हाण यांनी केले तर प्रास्ताविक अर्चना चव्हाण यांनी केले. कार्यक्रमानिमित्त गावामधील महिलांनी महिला दिवसाचे महत्व समजून आपली मनोगत व्यक्त केली,तर तर प्रमुख पाहुणे आनंद खुळे पंकज चव्हाण यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## लोहार लाईनमध्ये प्राणघातक हल्ला

यवतमाळ : पुसद येथील लोहार लाईन परिसरत एका २३ वर्षीय इसमावर धारदार सुरीने प्राणघातक हल्ला करण्यात आला. ही घटना ७ मार्च रोजी घडली. आरोपी बिलाल फारुख चव्हाण (२५) हा लोहार लाइन परिसरातील अल्ताफ हुसेन अब्दुल अजीज चव्हाण यांच्या दुकानात आला व बाजूलाच काम करीत असलेल्या अयाण शेख याला मारहाण करु लागला. मात्र त्याला मारहाण करु नको असे अल्ताफ हुसेन अब्दुल अजीज यांनी म्हणताच आरोपीचा पारा भडकला. त्याने थेट धारदार सुरीने त्यांच्यावर हल्ला चढविला. यात त्यांच्या उजव्या हाताच्या बोटावर तसेच छातीवर वार झाला. या प्रकरणी अल्ताफ हुसेल अब्दुल अजीज यांच्या फिर्यादीवरुन पुसद शहर पोलिसांनी बिलाल फारुख चव्हाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## कोटंबा येथे दारुसाठी वाद

यवतमाळ : दारु पिण्यासाठी पैसे न दिल्याने वाद घालत एका ३८ वर्षीय व्यक्तीला मारहाण करण्यात आली. ही घटना बाभूळगाव तालुक्यातील कोटंबा येथे ७ मार्चला घडली. अमोल जनार्धन तुमराम (३८) रा. कोटंबा याला नीलेश कवडू सोनवणे याने दारु पिण्यासाठी उसनवारीने पैसे मागितले. मात्र अमोल याने पैसे न दिल्यामुळे नीलेश चिडला. त्याने लाकडी काठीने डोक्यावर मारुन अमोलला जखमी केले. या प्रकरणी अमोल तुमराम याच्या फिर्यादीवरुन बाभूळगाव पोलिसांनी नीलेश सोनवणेविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# कॉपीच्या भरोशावर परीक्षा?

## कुसुमकोट कृषीतंत्र विद्यालयातील गंभीर प्रकार; 120 विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात

**▸विदर्भ केसरी। धारणी / मेळघाट प्रेमदास तायडे**




धारणीपासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या कुसुमकोट खुर्द येथील कृषीतंत्र विद्यालयात गंभीर अनियमिततेचा प्रकार समोर येत असल्याची माहिती मिळाली आहे. डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ , अकोला अंतर्गत अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या कृषीतंत्र विद्यालयात सध्या सुमारे 120 विद्यार्थी कृषी डिप्लोमा शिक्षण घेत आहेत, मात्र त्यांना शिकवण्यासाठी नियमित शिक्षकच नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. माहितीनुसार, या विद्यालयात केवळ एक प्राचार्य आणि एक शिक्षक पदावर असल्याचे सांगितले जात असले तरी तेही नियमित उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांकडून होत आहेत. परिणामी विद्यार्थ्यांना भौतिक व तांत्रिक शिक्षण मिळत नसल्याने त्यांच्या शैक्षणिक भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेषतः या परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला असल्याची चर्चा आहे.

दरम्यान, 9 मार्च 2026 रोजी डिप्लोमा परीक्षा होणार असून विद्यार्थ्यांकडून परीक्षा कॉपीच्या भरोशावर देण्याची वेळ येत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. काही विद्यार्थ्यांमध्ये पेपर आधीच बाहेर पडल्याच्या चर्चाही ऐकायला मिळत आहेत. त्यामुळे संपूर्ण परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या विद्यालयाकडे सुमारे 50 एकर शेती असून त्या शेतीतून मिळणारे उत्पन्न प्रशिक्षणार्थी विद्यार्थी व मजुरांच्या मदतीने घेतले जाते. मात्र या शेतीच्या उत्पन्नातही मोठा घोटाळा होत असल्याची चर्चा धारणी तालुक्यातील सुज्ञ नागरिकांमध्ये सुरू आहे. माहितीनुसार, या कृषीतंत्र विद्यालयात एकूण 25 पदे मंजूर असताना फक्त 2 पदे भरलेली असून तब्बल 21 पदे रिक्त आहेत. उर्वरित कामे कॉन्ट्रॅक्टवर ठेवलेल्या जवळपास 6 सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या भरोशावर सुरू असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या संस्थेच्या संपूर्ण कार्यप्रणालीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात विद्यार्थ्यांनी यापूर्वीही विद्यापीठ प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधींना तक्रारी केल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. दरम्यान, उद्याच्या परीक्षेत कॉपीचा प्रकार रोखला जाणार का? तसेच या कृषीतंत्र विद्यालयातील अनियमिततेवर वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार का? याकडे आता विद्यार्थी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## उभ्या ट्रकला धडकून दुचाकीस्वार ठार

यवतमाळ : नादुरुस्त अवस्थेत रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला धडक बसल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास राळेगाव तालुक्यातील आमलानजीक घडली. बाळा वसंत किनाके (४८) रा. गुजरी नागठाणा, ता. राळेगाव असे मृताचे नाव आहे. बाळा किनाके हे कळंब येथील एका कॉम्प्लेक्समध्ये पहारेकरी म्हणून काम करत होते. काम आटोपून गुजरी येथे जात होते. आमला गावाजवळ एमएच ४९ एटी ६०८९ क्रमांकाचा ट्रक नादुरुस्त झाल्यामुळे रस्त्याच्या कडेला उभा होता. ट्रकचालकाने कोणतीही सुरक्षा खबरदारी न घेतल्याने मागून येणाऱ्या बाळा किनाके यांची दुचाकी त्या ट्रकला धडकली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच कळंब पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या प्रकरणी महेश बाळाभाऊ किन्नाके (२६) याच्या फिर्यादीवरुन पोलिसांनी ट्रकचालकावर गुन्हा नोंद केला असून ट्रक ताब्यात घेतला आहे.

# मूर्तिजापूर तालुक्यात घरकुल योजनेत गैरप्रकार

### पात्र लाभार्थी वाऱ्यावर, बोगस नावांची चांदी!. प्रशासकीय यंत्रणेच्या संगनमताने अपात्र लोकांना मंजुरी दिल्याचा आरोप.



**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

शासनाच्या 'सर्वांसाठी घर' या महत्त्वाकांक्षी योजनेला मूर्तिजापूर तालुक्यात भ्रष्टाचाराचे ग्रहण लागल्याचे चित्र समोर येत आहे. तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये घरकुल मंजुरी प्रक्रियेत पात्र लाभार्थ्यांना डावलून, चक्क अपात्र आणि बोगस व्यक्तींच्या नावाने घरकुले मंजूर करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी आता जोर धरत आहे. नेमका प्रकार काय? मिळालेल्या माहितीनुसार, घरकुल योजनेसाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही अटी व शर्तींची पूर्तता न करता अनेक बोगस लाभार्थ्यांच्या नावाचा समावेश यादीत करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे आधीच पक्की घरे आहेत किंवा जे या योजनेच्या निकषात बसत नाहीत, अशा लोकांचे कागदोपत्री 'निल' अहवाल सादर करून त्यांना घरकुले बहाल करण्यात आली आहेत. पात्र लाभार्थी न्यायाच्या प्रतीक्षेत एकीकडे गरजू, भूमिहीन आणि खऱ्या अर्थाने झोपडीत राहणाऱ्या पात्र लाभार्थ्यांनी सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही त्यांना वर्षानुवर्षे प्रतीक्षा यादीत ठेवले जात आहे. तर दुसरीकडे, राजकीय वशिलेबाजी आणि आर्थिक देवाणघेवाणीतून अपात्र लोकांची फाईल काही दिवसांतच मंजूर केली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

- **कागदपत्रांची पूर्तता नाही कोणत्याही तांत्रिक तपासणीशिवाय आणि जागेच्या पुराव्याशिवाय बांधकामास मंजुरी देण्यात आली. विद्यमान घरांची लपवाछपवी, पक्की घरे असलेल्या व्यक्तींनाही गरिबी रेषेखाली दाखवून लाभ मिळवून दिला गेला. ग्रामसेवक, सरपंच व संबंधित विभागाच्या अभियंत्यांच्या संगनमताशिवाय इतका मोठा गैरप्रकार होणे अशक्य असल्याचे बोलले जात आहे.खऱ्या गरिबांच्या हक्काचे घर हिरावून घेणाऱ्या या रॅकेटचा पर्दाफाश होणे गरजेचे आहे. जर बोगस लाभार्थ्यांची नावे वगळून दोषींवर कारवाई झाली नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन करू." योगेश वाघ.वृदांवन नगर.**
- **या प्रकरणी संतप्त नागरिकांनी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल होणार असून, तालुक्यातील सर्व मंजूर घरकुलांचे 'सोशल ऑडिट' (सामाजिक अंकेक्षण) करण्याची मागणी केली आहे. आता प्रशासन याकडे गांभीर्याने बघून दोषींवर गुन्हे दाखल करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## मूर्तिजापूर येथे दहावे राज्यस्तरीय सृजन साहित्य संमेलन.

ग्रंथदिंडी,कविसंमेलन,गझल मुशायरा,हास्यबळी डॉट कॉम,रंग कवितेचे,नैसर्गिक शेतीनिष्ठांचा सन्मान,कार्यक्रमांची रेलचेल!

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर -**

दहावे एक दिवसीय राज्यस्तरीय सृजन साहित्य संमेलन,मूर्तिजापूर येथे आयोजित करण्यात आले आहे. ग्रंथदिंडी,उद्घाटन समारंभ, हास्य बळी डॉट कॉम,निमंत्रितांचे कविसंमेल,बहारदार गझल मुशायरा, रंग कवितेचे,नैसर्गिक शेतीनिष्ठांचा सन्मान व इतरही कार्यक्रमांची रेलचेल या संमेलनात राहणार आहे.

राज्यभरातून साहित्यिक,कवी, गसलकार,कलाप्रेमी सदर साहित्य संमेलनासाठी उपस्थित राहणार आहेत.मूर्तिजापूर येथील भगवंत लॉन सभागृहात, रविवार दिनांक २२ मार्च २०२६ ला हे संमेलन संपन्न होणार आहे.

तीक्ष्णगत मल्टीपर्पज सोसायटी, अकोला व सृजन साहित्य संघ, मूर्तिजापूर व्दारा आयोजित या संमेलनास,मूर्तिजापूर येथील रसिकांनी उपस्थित राहुन, दिवसभर साहित्यिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीव्दारे करण्यात आले आहे. रवींद्र जवादे,प्रमोद पंत,विष्णु लोडम,विलास वानखडे,सुनिल ढोकणे,किशोर आष्टीकर,शैलेश गिरी,विनोद महल्ले,मीना जवादे,निलीमा आष्टीकर आदी सर्व आयोजक,संमेलनाचे आयोजन करण्यासाठी कार्यरत आहेत.

# शहरात (विषमुक्त/सेंद्रीय) शेतमाल ला उत्स्फूर्त प्रतिसाद

### थेट शेतकरी ते थेट ग्राहक उपक्रमाअंतर्गत विक्री

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा :-**



शहरात थेट शेतकरी ते ग्राहक विक्री उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील खैरगांव (देशमुख) येथील शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी आपल्या शेतातील (विषमुक्त/सेंद्रीय) वायगाव हळद पावडर,ओली हळद लोणचं तयार करण्यासाठी,मोसंबी,शेतकऱ्यांकडून ग्राहकांना उपलब्ध करून दिला जात असल्यामुळे पांढरकवडा शहरात शेतमालाला ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.रासायनिक खते व कीटकनाशकांशिवाय उत्पादित केलेला शेतमाल पांढरकवडा येथील बिरसा मुंडा चौक येथे स्टॉल लावून थेट शेतकरी ते ग्राहक उपक्रमाअंतर्गत विक्री करण्यात येत आहे.थेट शेतकरी ते ग्राहक विक्री या उपक्रमामुळे ग्राहकांना आरोग्यदायी अन्न,तर शेतकऱ्यांना रास्त भाव मिळण्यास मदत होत आहे. मध्यस्थांना (दलाल) फाटा देऊन शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी शेतातील (विषमुक्त/सेंद्रीय)आपला माल थेट ग्राहकांना विकत असुन ग्राहकांना परवडणाऱ्या दरात आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत आहे.गेल्या दोन वर्षांपासून शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी शेतातील शेतमाल शहरात विक्री करीत असून ग्राहकांचा खूप छान प्रतिसाद मिळत आहे.शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी आपल्या शेतात देशी गाईचे शेण गोमूत्रा चा वापर करून जीवामृत,घनजीवामृत,पिकाला देत आहे.पिकांवरील किडीच्या आळी च्या नियंत्रणाकरीता दशपर्णी अर्क,नीम अर्क,ब्रम्हास्त्र अर्क,चा वापर करीत आहे.बुरशीच्या नियंत्रण करीत आंबट ताक अर्क वापर करतो.रासायनिक खते व कीटकनाशकांशिवाय उत्पादित केलेला (विषमुक्त/सेंद्रीय) शेतमाल थेट शेतकऱ्यांकडून ग्राहकांना उपलब्ध करून दिला जात आहे.

या उपक्रमामुळे ग्राहकांना आरोग्यदायी अन्न,तर शेतकऱ्यांना रास्त भाव मिळण्यास मदत होत आहे.जो लोकांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी आणि विषमुक्त अन्नाला प्रोत्साहन देण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.आजरोजी रासायनिक शेतीमुळे कॅन्सर,अटॅक,बीपी,शुगर,विविध आजार वाढले आहे.म्हणून शेतकरी बांधवांनी एक एकर पासून विषमुक्त सेंद्रिय शेतीचा सुरुवात करावी असे आवाहन शेतकरी रविंद्र देशट्टीवार यांनी केला आहे.

# इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्याला यश–पुसद मतदार संघातील रस्ते व पुलांसाठी अर्थसंकल्पातून 42 कोटींची मंजुरी!

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



पुसद :- 08.03.2026 महाराष्ट्र राज्याचा 2026-27 या वर्षाचा अर्थसंकल्प राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दि. 6 मार्च 2026 रोजी विधानसभेत सादर केला. हा अर्थसंकल्प राज्यातील सर्व घटकांना न्याय देणारा, विकासाला गती देणारा तसेच शेतकरी, महिला, युवक आणि उद्योग क्षेत्राला बळकटी देणारा आशावादी अर्थसंकल्प म्हणून पाहिला जात आहे.

या अर्थसंकल्पात पुसद मतदार संघांसाठी महत्त्वपूर्ण निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यमंत्री मा. श्री. इंद्रनील नाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पुसद तालुक्यातील राज्य मार्ग, जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग तसेच त्या मार्गांवरील पुलांच्या बांधकामासाठी 42 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे पुसद मतदार संघातील रस्ते व दळणवळण व्यवस्था अधिक मजबूत होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पुसद मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी जणू विकासाचा चंगच बांधला आहे. पुसदसाठी जास्तीत जास्त निधी आणण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न स्पष्टपणे दिसून येत आहे. नुकत्याच मागील आठवड्यात MIDC पुसद मधील उद्योगांना चालना देण्यासाठी व स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 72 कोटी रुपयांचा निधी MIDC च्या पायाभूत सुविधांसाठी मंजूर करून आणण्यात आला आहे.त्यानंतर आता अर्थसंकल्पातून पुसद मतदार संघातील रस्त्यांच्या विकासासाठी 42 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्यामुळे येत्या काळात पुसद मतदार संघातील रस्ते अधिक दर्जेदार व सुरक्षित होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

- **पुसद मतदार संघातील उद्योग, रोजगार व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी नाईक परिवार सातत्याने काम करत राहील. -राज्यमंत्री इंद्रनील नाईक....**

या निधीमुळे मतदार संघातील विकासाला नवी गती मिळणार असून उद्योग, व्यापार आणि दळणवळण व्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पुसदच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी आणण्याचा माझा प्रयत्न कायम राहील असा विश्वास राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी व्यक्त केला.

# पुसद प्रकल्पस्तरीय कर्मचारी क्रीडा स्पर्धा उत्साहात

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**




पुसद शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या यशवंत रंग मंदिर मैदानावर २८ फेब्रुवारी रोजी पुसद प्रकल्पस्तरीय कर्मचारी क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात व थाटात पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन पुसदचे उपविभागीय अधिकारी आशिष बिजवाल यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून पुसद शहर पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते वीर बिरसा मुंडा व राणी दुर्गावती यांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आले तसेच दीपप्रज्वलन करण्यात आले. क्रीडा ध्वजारोहण व ज्योत प्रज्वलनानंतर रवी घड्याळे व एस.पी. हजारे यांनी कर्मचारी खेळाडू व पंचांना क्रीडा शपथ दिली.

यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी आशिष बिजवाल यांनी प्रत्येकाने आपल्या शरीरासाठी वेळ देणे आवश्यक असल्याचे सांगितले. सध्या देशभरात शुगर व बीपीसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याने आरोग्य टिकविण्यासाठी खेळ आणि व्यायाम अत्यंत आवश्यक असल्याचे मत पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांनी व्यक्त केले. तर व्यायाम किंवा खेळात सातत्य ठेवणे महत्वाचे असून त्यासाठी आळस दूर करणे गरजेचे आहे, असे प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांनी सांगितले.

या क्रीडा स्पर्धांसाठी प्रकल्पांतर्गत चार सांघिक गट तयार करण्यात आले होते. यामध्ये शासकीय आश्रमशाळा कर्मचारी, अनुदानित आश्रमशाळा कर्मचारी, मुला-मुलींच्या वसतिगृहांचे कर्मचारी तसेच प्रकल्प कार्यालयातील कर्मचारी यांचा समावेश होता. स्पर्धांमध्ये १०० मीटर, ४०० मीटर धावणे, थाळी फेक, गोळाफेक, भालाफेक, कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन, क्रिकेट, व्हॉलीबॉल अशा इनडोअर व आऊटडोअर खेळांचा समावेश होता.

शासकीय व अनुदानित शाळांचे कर्मचारी, वसतिगृहातील कर्मचारी तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. स्पर्धेतील विजयी खेळाडू कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.कोटूरवार यांनी केले. संचालन नारायण राऊत यांनी केले तर आभार प्रदर्शन समाधान जाधव यांनी मानले. प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धांचे नियोजन करण्यात आले. पंच म्हणून सर्व क्रीडा शिक्षक व समिती सदस्यांनी परिश्रम घेतले. यावेळी मंचावर लेखाधिकारी विष्णू चव्हाण, सहाय्यक प्रकल्प अधिकारी शिक्षण अरुण चव्हाण, चटलेवाड, संदीप राऊत, कवडे, वंदना वानखेडे, श्रीमती नरवाडे, वीर, शिरीष मेतकर, डी. व्ही. आडे, रवि पवार तसेच शासकीय वसतिगृहांचे गृहपाल, शासकीय व अनुदानित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कांचन तेलमोरे यांना पुरस्कार

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर प्रतिनिधी**

समाजातील बालकांचे संगोपन, पोषण आणि शिक्षणासाठी सातत्याने समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या बोराळा येथील अंगणवाडी सेविका सौ. कांचन राहुल तेलमोरे यांना “गोडी इंग्रजीची” या नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत ‘उत्कृष्ट अंगणवाडी सेविका’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अमरावती येथे आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार महाराष्ट्राचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी खासदार अनिल बोंडे , आमदार संजय खोडके , आमदार सुलभा खोडके , आमदार रवि राणा , प्रवीण तायडे, राजेश वानखडे, आमदार गजानन लवटे, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता शिंगल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा, प्रकल्प संचालिका प्रीती देशमुख, रंजन वानखडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात पर्यवेक्षिका वैशाली बाजीराव पवार यांनाही त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून बालविकास, पोषण आणि समाजजागृतीसाठी होत असलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले. सौ. कांचन तेलमोरे यांनी अंगणवाडी केंद्र बोराळा येथे बालकांच्या शिक्षणात “गोडी इंग्रजीची” उपक्रम प्रभावीपणे राबवून बालकांमध्ये इंग्रजी भाषेबद्दल आवड निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत जिल्हास्तरावर हा सन्मान देण्यात आला. या पुरस्कारामुळे दर्यापूर प्रकल्पात त्यांच्या अभिनंदनाचा वर्षाव होत असून, अंगणवाडी क्षेत्रात कार्य करणाऱ्या इतर सेविकांसाठीही हा गौरव प्रेरणादायी ठरत आहे.

Selected

## अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याची मागणी



महागाव : शेरखान पठान तालुक्यात सुरू असलेल्या अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखावी तसेच कोणत्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार होऊ नयेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद मुदस्सीर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महिला व बाल विकास विभागामार्फत अंगणवाडी मदतनीस पदासाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. मात्र काही ठिकाणी ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविली जात नसल्याची तसेच आर्थिक व्यवहार करून नियुक्त्या मिळत असल्याची चर्चा परिसरात होत आहे. त्यामुळे पात्र उमेदवारांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अंगणवाडी मदतनीस पद हे महिला व बालकांच्या आरोग्य, पोषण व संगोपनाशी संबंधित महत्त्वाचे पद असल्यामुळे या पदासाठी पात्रता व गुणवत्तेनुसारच उमेदवारांची निवड होणे आवश्यक आहे. परंतु भरती प्रक्रियेतील गुणांकन, कागदपत्र पडताळणी तसेच अंतिम निवड याबाबत पारदर्शकता नसल्याच्या तक्रारी पुढे येत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तरी अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रियेची सखोल चौकशी करून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष पद्धतीने राबविण्यात यावी. तसेच आर्थिक व्यवहार किंवा इतर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद मुदस्सीर यांनी केली आहे.

---

## आरमोरीत कोंबड्यांच्या झुंजीवर पोलिसांची धाड ; एक आरोपी अटकेत

आरमोरी :- येथे अवैध कोंबड्यांच्या झुंजीवर आरमोरी पोलिसांनी धाड टाकत एका आरोपीला अटक केली असून, तिघे जण फरार झाले आहेत. कारवाईदरम्यान सुमारे ३ लाख ५६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई ६ मार्च रोजी दुपारी १२.३० ते १.२५ वाजताच्या दरम्यान पालोरा-कन्हेरी मार्गावरील आशिष निंबेकर यांच्या विटा भट्टीजवळ करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप नामदेवराव मोहर्ले (५७), पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन आरमोरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन पंचांसमक्ष छापा टाकला असता तेथे कोंबड्यांच्या झुंजीच्या जुगाराचा प्रकार सुरू असल्याचे आढळून आले. या प्रकरणात प्रितमकुमार जगन्नाथ जांभुळे (४९, रा. आझाद चौक, आरमोरी) याला अटक करण्यात आली आहे. तर स्वप्निल तितीरमारे, कमलेश गोवर्धन आणि मनोज गोंधळे हे तिघे आरोपी फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. कारवाईदरम्यान आरोपीकडून रोख रक्कम, कोंबड्यांच्या झुंजीसाठी वापरण्यात येणाऱ्या लोखंडी धारदार कात्या, एक जिवंत कोंबडा तसेच नऊ मोटार वाहने असा एकूण ३ लाख ५६ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# गडचिरोलीत 'एचपीव्ही' लसीकरण मोहिमेचा दिमाखात शुभारंभ

## मुलींचे आरोग्य सुरक्षित करण्याचे प्रशासनाचे पाऊल..!

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

गडचिरोली :- जिल्ह्यामध्ये महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला (CERVICAL CANCER) प्रतिबंध घालण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली आदरणीय आरोग्य मंत्री प्रकाशजी आबिटकर व आदरणीय आरोग्य राज्यमंत्री श्रीम मेघना बोर्डीकर यांच्या सूचनेनुसार गडचिरोली जिल्ह्यात 'एचपीव्ही' (HPV) लसीकरण मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ आज जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे उत्साहात पार पडला. या मोहिमेद्वारे जिल्ह्यातील १४ वर्षे पूर्ण व १५ वर्षाखालील असलेल्या किशोरवयीन मुलींना हे 'सुरक्षा कवच' मोफत दिले जाणार आहे. तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि आवाहन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा लहाडे यांनी या लसीचे महत्त्व अधोरेखित केले. "गर्भाशय मुखाचा कर्करोग हा वेळीच लसीकरण केल्यास पूर्णपणे टाळता येण्यासारखा आजार आहे. पालकांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता आपल्या मुलींचे आरोग्य सुरक्षित करण्यासाठी या मोहिमेत उस्फुर्त पणे सहभागी व्हावे," असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. माधव शिंदे यांनी मोहिमेच्या तांत्रिक बाबी आणि सूक्ष्म नियोजनाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ही लस सुरक्षित असून जगभरात ती प्रभावी ठरली आहे. महिला व बाल



रुग्णालय गडचिरोलीच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. माधुरी किलनाके यांनी किशोरवयीन मुलींच्या आरोग्यविषयक समस्या आणि लसीकरणाची गरज यावर प्रकाश टाकला. तसेच जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रफुल हुलके यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. "गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमधील मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे, परंतु 'एचपीव्ही' लसीकरणामुळे हा धोका ९० टक्क्यांहून अधिक कमी करता येतो. गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील एकही मुलगी या सुरक्षा कवचापासून वंचित राहू नये, यासाठी आमचे आरोग्य पथक सज्ज आहे असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांनी सांगितले आहे. लाभार्थी मुलीचा पुढाकार या शुभारंभ प्रसंगी अस्मिता मन्ना सासमल या लाभार्थी मुलीला 'एचपीव्ही' लस देऊन मोहिमेची सुरुवात करण्यात आली. लस घेतल्यानंतर अस्मिताने आपला अनुभव सांगताना इतर मुलींना आणि पालकांना आवाहन केले की, "ही लस घेतांना मला कोणताही त्रास झाला नाही. आपल्या भविष्यातील आरोग्यासाठी ही लस अत्यंत महत्त्वाची आहे, त्यामुळे माझ्यासारख्या इतर सर्व मुलींनी आणि त्यांच्या पालकांनी पुढाकार घेऊन हे लसीकरण पूर्ण करून घ्यावे." उपस्थित मान्यवर आणि अधिकारी या प्रसंगी जिल्हा प्रशासनातील आणि आरोग्य विभागातील विविध तज्ज्ञ डॉक्टरांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये डॉ. मनीष मेश्राम (भीशक, वर्ग-१),डॉ. शिवाजी लहाडे (सर्जन) डॉ. बागराज धुर्वे (निवासी वैद्यकीय अधिकारी, बाह्यसंपर्क) डॉ. प्रशांत पेंदाम (बालरोगतज्ञ), डॉ सचिन हेमके जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ अमित साळवे तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. अंजली साखरे (रक्त संक्रमण अधिकारी) , डॉ. दिनेश रोकडे (जिल्हा आयुष अधिकारी) तसेच या कार्यक्रमाला जिल्हा सामान्य रुग्णालयातील सहा. अधिसेविका राखी गादेवार, प्रतिज्ञा रामटेके PHN यांनी सूत्रसंचालन केले, श्रीमती अर्चना प्रधान PHN, श्रीमती अंजू यावले, परिसेविका, श्रीमती सारिका दुधे, पाठ्यनिर्देशिका, व इतर कर्मचारी कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घोषणांनी दुमदुमला रुग्णालय परिसर

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात उपस्थित अधिसेविका, परिचारिका आणि आशा स्वयंसेविकांनी हातात जनजागृतीपर फलक घेऊन 'एचपीव्ही' लसीकरणाच्या समर्थनार्थ जोरदार घोषणा दिल्या. "कर्करोगाला हरवायचे आहे, लसीकरण करायचे आहे", "सुरक्षित मुलगी, सुरक्षित भविष्य" अशा घोषणांनी जिल्हा सामान्य रुग्णालयाचा परिसर दुमदुमून गेला होता. या माध्यमातून आरोग्य कर्मचाऱ्यांनी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत हा संदेश पोहोचवण्याचा संकल्प केला. ज्यामुळे मोहिमेच्या सुरुवातीलाच एक मोठी जनचळवळ निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# आदर्श महाविद्यालयात वार्षिकोत्सवाचे यशस्वी आयोजन

**विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज - विविध विषयाचे ज्ञान व कला-गुण व्यक्तीला खऱ्या अर्थाने समृद्ध करतात. शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थांना त्यांच्या आवडीच्या विषयज्ञाना बरोबरच त्यांच्यातील उपजत कलागुनांना प्रोत्साहित करून अभिव्यक्तीसाठी मंच उपलब्ध करून दिल्यास ते कलागुण अधिक विकसित होतात, असा उद्देश ठेऊन स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व क्रिडा विभागाच्या सयुंक्त विद्यमाने वार्षिक युवा महोत्सव २०२५-२६ चे उत्साहात आयोजन करण्यात आले. यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी १०० मीटर धावणे, लांब उडी, गोळा फेक, थाळी फेक, शॉट पिच क्रिकेट अशा विविध क्रिडा व गीत गायन, वक्तृत्व, एकांकिका, प्रश्नमंजुषा, चित्रकला, स्वरचित कविता वाचन, वेशभूषा, फॅशन शो, व्यंजन, एकल नृत्य, समूह नृत्य आदी सांस्कृतिक/बौद्धिक स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. श्रीराम गहाणे यांचे अध्यक्षतेखाली, समाजशास्त्र विभाग प्रमुख



डॉ. व्ही. जी. चव्हाण यांचे हस्ते व सांस्कृ. विभाग प्रमुख व वार्षिकोत्सव आयोजन प्रमुख प्रा. डॉ. हितेंद्र धोटे यांचे प्रमुख उपस्थितीत वार्षिकोत्सवाचे उद्घाटन झाले. "व्यक्तीची कला ही स्वतःसाठी व इतरांसाठी आनंदाचा स्रोत असते. तिला व्यावसायिक स्वरूपात विकसित केल्यास ती उपजीविकेचे माध्यमही बनते. कलेची साधना करणाऱ्या कलावंत विद्यार्थ्यांसाठी वार्षिकोत्सव हे हक्काचे दालन आहे.
विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे कलागुणांना सादर करावे व इतरांनी त्यातून प्रेरणा घ्यावी," असे आवाहन प्रा. डॉ. हितेंद्र धोटे यांनी यावेळी केले.
"ज्ञान व कलागुणांचा संगम व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला अष्टपैलू आकार देतात" असे मनोगत डॉ. व्हि. जी. चव्हाण यांनी व्यक्त केले. तर "वार्षिकोत्सव म्हणजे स्नेह व कलांची उधळण करणारा आनंदोत्सव होय. कला व्यक्तीला निराशेपासून दूर ठेवतात.
स्पर्धांतील सहभाग म्हणजेच पुरस्कार मानून विद्यार्थ्यांनी खिलाडूवृत्तीने वार्षिकोत्सवामध्ये सहभागी व्हावे," असा संदेश डॉ. श्रीराम गहाणे यांनी अध्यक्षीय मनोगतात दिला. वार्षिकोत्सवादरम्यान आयोजित विविध क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. आर. डी. चावके, डॉ. निहार बोदेले, प्रा. अमोल बोरकर, प्रा. योगेश तुपट, प्रा. ज्ञानेश मोहूर्ले, प्रा. राजेश्वर वघारे प्रा. दिपाली मैंद, डॉ. वैशाली बोरकर, प्रा. वैशाली लिचडे, प्रा. जितेंद्र राऊत, प्रा. अनिल होळी, प्रा. हर्षा बगमारे, प्रा. प्रियंका ठाकरे, प्रा. शितल कोसे, प्रा. तेजस आत्राम, प्रा. मनिषा कार, प्रा. पौर्णिमा बुरडे, प्रा. शिफाना शेख, प्रा. अमित मलगाम, प्रा. रुची बावणे आदींनी मेहनत घेतली.

# सामुहिक व एकल गोंडी नृत्य स्पर्धा

**विदर्भ केसरी । यवतमाळ**

क्रांतिवीर बाबुराव पुल्लेसुर शेडमाके यांच्या १९३ व्या जयंती निमित्त क्रांतीवीर बाबुराव शेडमाके उत्सव समिती वाघापूर च्या वतीने क्रांतीवीर बाबुराव शेडमाके चौक चौसाळा रोड वाघापूर येथे दि. १२ मार्च सायंकाळी ६ वाजता सामुहिक गोंडी नृत्य स्पर्धा प्रथम बक्षीस-६७५०/-₹ पेनवासी डॉ.उद्धवराव दमडाजी कुडमेथे यांच्या स्मृती प्रित्यर्थ मनोज शोभाताई उद्धव कुडमेथे यांचे कडून द्वितीय बक्षीस- ५७५०/-₹ राजु मडावी साहेब उप शिक्षणासाठी प्राथमिक ,जि. प. तथा जिल्हा अध्यक्ष विस्तार अधिकारी संघटना,यवतमाळ म.रा.यांचे कडून तृतीय बक्षीस- ४७५०/-₹ पेनवासी सुभद्रा पेंदोर व पेनवासी अरुणाताई आडे यांच्या स्मृति प्रित्यर्थ माई सुभद्रा मल्टी स्पेशलिस्ट क्लिनिक बाभुळगाव डॉ गोवर्धन पेंदोर यांचे कडून चतुर्थ बक्षीस- ३७५०/-₹ पेनवासी राजाभाऊ झोलबाजी टेकाम यांच्या स्मृती प्रित्यर्थ शरदभाऊ टेकाम यांचे कडून दि. ११





मार्च सायंकाळी ६ वाजता एकल गोंडी नृत्य स्पर्धा प्रथम बक्षीस- ४७५० /-₹ पेनवासी कल्पनाताई नारायणराव मरसकोल्हे, माजी उपसभापती पं.स. यवतमाळ यांच्या स्मृती प्रित्यर्थ तिरु नारायणराव मरसकोल्हे यांचे कडून द्वितीय बक्षीस- ३७५०/-₹ पेनवासी माणिकराव कौरते यांच्या स्मृति प्रित्यर्थ नामदेवराव कुमरे साहेब निवृत्त कृषी अधिकारी यवतमाळ यांचे कडून तृतीय बक्षीस- २७५०/-₹ पेनवासी सरस्वती खुशालराव मडावी यांच्या स्मृति प्रित्यर्थ वंदना भारत मडावी सर यांचे कडुन चतुर्थ बक्षीस- १७५०/- ₹ पेनवासी कमलाबाई भाऊराव उईके यांचे स्मृती प्रित्यर्थ तिरु. नरेश उईके यांचे कडून प्रोत्साहन बक्षीस ३७५०/-रु (५ जनाना) प्रकाश येरमे केंद्रप्रमुख पं. स. यवतमाळ यांचे कडून राहील. संपर्क 9545901709, 9423625449 नृत्य स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन क्रांतीवीर उत्सव समिती प्रवर्तक नरेश उईके अध्यक्ष पवनकुमार आतराम, बंडूभाऊ मसराम, भिमराव मरसकोल्हे,दिलीप शेडमाके,विनोद मडावी, किशोर उईके,गजानन कोटनाके,प्रल्हाद सिडाम, गुलाबराव मेश्राम, लक्ष्मण कुळसंगे, अजय उईके,प्रा. चंद्रशेखर कुडमेथे, पुडलिंक वरमे, गुलाबराव घोडाम,दिलीप मसराम यांनी केले आहे. असे प्रसिद्ध प्रमुख कृष्णा पुसणाके, भरत गेडाम यांनी कळवले आहे.

# गडचिरोली जिल्हा पोलीस भरतीची मैदानी चाचणी संपन्न...!

**विदर्भ केसरी । गडचिरोली**

जिल्ह्यातील ७१७ पोलीस शिपाई व २७ चालक पोलीस शिपाई पदाकरीता एकूण २०,७९७ उमेदवारांनी दिली मैदानी चाचणी एकुण ५५१ पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच अंत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पोलीस भरती मैदानी चाचणी सुरळीतपणे संपन्न झाली असून, गडचिरोली पोलीस दलामार्फत पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ (प्रत्यक्ष भरती प्रक्रिया २०२६) च्या ७१७ पदांकरीता तसेच चालक पोलीस शिपाई भरती २०२४-२०२५ (प्रत्यक्ष भरती प्रक्रिया २०२६) च्या २७ पदांकरिता भरती प्रक्रिया सुरु असून सदर दोन्ही भरती करिता मैदानी (शारिरीक) चाचणी ११ फेब्रुवारी २०२६ सुरु होऊन आज ०७ मार्च २०२६ रोजी गडचिरोली पोलीस मुख्यालयातील पोलीस कवायत मैदान येथे सुरळीतपणे संपन्न झाली आहे.

सविस्तर वृत्त असे की, ७१७ पोलीस शिपाई पदाकरिता एकुण २३,७९१ उमेदवारांनी अर्ज सादर केले होते असून त्यापैकी १३,६७४ पुरुष उमेदवार व ६,५७३ महिला उमेदवार हजर झाले होते. त्यापैकी १२,६३१ पुरुष व ५,७४३ महिला उमेदवार असे एकुण १८,३७४ उमेदवारांनी प्रत्यक्ष मैदानी चाचणी दिली. तसेच चालक पोलीस शिपाईच्या २७ पदाकरिता ३,२९६ उमेदवारांनी आपले अर्ज सादर केले होते. त्यापैकी २,३४७ पुरुष व ४५२ महिला उमेदवार शारिरीक चाचणी करीता हजर आले होते व त्यापैकी २,०९९ पुरुष व ३२४ महिला उमेदवार असे एकुण



२,४२३ उमेदवारांनी प्रत्यक्ष मैदानी चाचणी दिली.
यासोबतच उमेदवारांची वाहन कौशल्य चाचणी एम.आय.डी.सी. मैदानावर प्रादेशिक परिवहन अधिकारी, गडचिरोली (आरटीओ) यांच्या समक्ष सुरु असून १० मार्च २०२६ रोजी पर्यंत एकुण ५७५ उमेदवारांची कौशल्य चाचणी घेण्यात येणार आहे. सदर भरती प्रक्रियेदरम्यान मैदानी चाचणी झालेल्या उमेदवारांची गुणांची यादी गडचिरोली पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर लगेचच दुसया दिवशी प्रकाशीत केली जात होती. आतापर्यंत मैदाणी चाचणी झालेल्या सर्व उमेदवारांच्या गुणांची यादी व लेखीपरिक्षेकरीता पात्र उमेदवारांची यादी तसेच लेखी परिक्षेचा दिनांक पुढील आठवड्यात गडचिरोली पोलीस दलाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सदर पदभरती प्रक्रिया ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पुर्णपणे पारदर्शक पध्दतीने राबविण्यात आली असून यामध्ये उमेदवारांची छाती-उंची या शारीरीक मोजणीकरीता पीएसटी (PST) Digital Physical Standard Test तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. तसेच उमेदवारांची १६०० मी. धावणे (पुरुष), ८०० मी. धावणे (महिला), १०० मी. धावणे (पुरुष व महिला) च्या चाचणी करीता (RFID) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यासोबतच गोळा फेक चाचणीकरीता Prism Technology चा वापर करण्यात आला आहे. तसेच उमेदवारांना मैदानी चाचणी दरम्यान काही दुखापत झाल्यास तात्काळ उपचार होण्याकरीता मैदानातच रुग्णालयाची सोय करण्यात आली होती व इतर काही अडचणी आल्यास त्याचे निराकरण पोलीस अधीक्षक, गडचिरोली नीलोत्पल यांचे समक्ष प्रत्यक्षरित्या करण्यात आले. या मैदानी चाचणी बंदोबस्ताकरीता ६९ पोलीस अधिकारी व ४८२ अंमलदार असे एकुण ५५१ मनुष्यबळ तैनात करण्यात आले होते.

# संग्रामपूर तालुक्यातील काटेल धाम येथे दिव्यांग वधू-वर परिचय मेळावा

**विदर्भ केसरी । संग्रामपूर**

दिव्यांग बांधवांना हक्काचा जोडीदार मिळावा, त्यांच्या सामाजिक पुनर्वसनाला चालना मिळावी आणि आयुष्याला नवी उमेद मिळावी या उद्देशाने बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील काटेल धाम येथे १३ मार्च रोजी दिव्यांग वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.
तालुक्यात प्रथमच अशा स्वरूपाचा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती आयोजकांनी दिली. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड बुलढाणा, बुलढाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी मर्या. बुलढाणा, श्रीराम कुटे गुरुजी फाउंडेशन जळगाव जामोद, श्री संत गुलाबबाबा संस्था काटेल धाम तसेच दिव्यांग क्रांती संघटना, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.
अंध, मूकबधिर तसेच अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना योग्य जोडीदाराची निवड करता यावी आणि त्यांच्या जीवनात स्थैर्य व सुसह्यता यावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. या मेळाव्याला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून दिव्यांग बांधवांच्या आयुष्यात नवी उमेद निर्माण करण्यासाठी साक्षीदार व्हावे, असे आवाहन बुलढाणा अर्बनचे उपाध्यक्ष डॉ.किशोर केला यांनी केले आहे.

# महिला दिनाचे महत्त्व आणि वास्तव!!

8 मार्च हा महिलांच्या अजोड कर्तृत्वाला, शक्तीला आणि सामाजिक योगदानाला सलाम करण्याचा दिवस आहे. स्त्री केवळ कुटुंबाचा आधारस्तंभ नसून ती शिक्षण, संरक्षण, राजकारण ते अंतराळ अशा सर्वच क्षेत्रांत प्रगती करत आहे. तिचा आत्मसन्मान आणि हक्क जपून, समानता आणणे हीच खऱ्या अर्थाने महिला शक्तीचा आदर करणे आहे . महिला शक्ती महिला शक्तीचा अर्थ केवळ शारीरिक ताकद नाही, तर मानसिक स्थिरता आणि संघर्ष करण्याची क्षमता होय. आजची महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. तिने आपल्या दुर्दम्य आशावादाच्या जोरावर समाजातील रूढी-परंपरांना छेद देत, स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. महिला दिनाचे महत्त्व आणि वास्तवमहिला दिन हा केवळ भेटवस्तू देण्याचा दिवस नसून, तो महिलांना त्यांच्या हक्कांची, समतेची आणि आत्मसन्मानाची जाणीव करून देणारा दिवस आहे. शेतात राबणाऱ्या कष्टकरी शेतकरी बहिणीपासून ते कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांपर्यंत, सर्वांचे योगदान अमूल्य आहे. स्त्रीला शिक्षण आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र करणे हे महिला सक्षमीकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे, ज्यामुळे ती निर्भयपणे निर्णय घेऊ शकेल.
महिला सक्षमीकरणाची पंचसूत्री__ भारतीय स्त्री शक्ती ५ प्रमुख सूत्रांवर काम करते: शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन, समानता आणि आत्मविश्वास या ५ गोष्टी आत्मसात करूनच आपण एका प्रगत समाजाची निर्मिती करू शकतो. "नारी शक्ती" म्हणजे सृजनात्मकता आणि धैर्याचे प्रतीक आहे. समाज, राष्ट्र आणि विश्वाच्या उभारणीत तिचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यामुळे, केवळ एका दिवशी नाही, तर ३६५ दिवस तिच्या प्रयत्नांचा आदर करणे, तिला सुरक्षित वातावरण देणे आणि तिचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन देणे हे आपले कर्तव्य आहे. सर्व महिलांना जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!


सौ. सुशीला लोणारे
मुख्याध्यापिका
नगरपरिषद प्रा. शाळा
क्रमांक.5 नरखेड
जिल्हा नागपूर.
7387719921



# मतिमंद बेसहारा महिलेचा विनयभंग; आरोपीला सावलीतून अटक!

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

चंद्रपूर :- जिल्ह्यामध्ये मूल शहरातील नवभारत विद्यालय परिसरात एका मतिमंद व बेसहारा महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. न्यायालयात हजर केल्यानंतर आरोपीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, गांधी चौक ते विश्रामगृह मार्गावरील नवभारत विद्यालय परिसरात भीक मागून उदरनिर्वाह करणारी एक मतिमंद महिला नेहमीप्रमाणे दुकानाच्या शटरजवळ झोपली होती. शुक्रवारी मध्यरात्री सुमारे



१२ ते २ वाजताच्या दरम्यान एका इसमाने तिचा विनयभंग केल्याची घटना घडली. दरम्यान, महिलेच्या आरडाओरडाचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक जागे झाले. त्यांनी बाहेर येताच आरोपी अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळून गेला. नागरिकांनी तत्काळ घटनेची माहिती मूल पोलिसांना दिली. माहिती मिळताच मूल पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी महिलेला मूल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.
पोलिस निरीक्षक विजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सुबोध वंजारी तसेच महिला उपनिरीक्षक वर्षा नैताम यांच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या आधारे आरोपीची ओळख पटवली. त्यानंतर आरोपी शेखर कोंडूजी मेश्राम (४०), रा. आंबेडकर चौक, सिंदेवाही याला सावली येथून अटक करण्यात आली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असून पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक वर्षा नैताम करीत आहेत.

# टीम इंडियाने राखलं टी२० वर्ल्डकपचं जेतेपद

## भारत बनला सलग दोन वर्ल्ड कप जिंकणारा पहिला संघ

विदर्भ केसरी । अहमदाबाद

अहमदाबादच्या जगातल्या सगळ्यात मोठ्या स्टेडियमवर सव्वा लाख चाहत्यांच्या साक्षीने भारतीय संघाने दणदणीत वर्चस्वासह टी२० वर्ल्डकपच्या अंतिम लढतीत न्यूझीलंडचा धुव्वा उडवत जेतेपदावर नाव कोरलं.२०२४ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वात भारतीय संघाने जेतेपदाची कमाई केली होती. आतापर्यंत कोणत्याच संघाला जेतेपद कायम राखता आलं नव्हतं. दोन वर्षांपूर्वी रोहितसेनेचा भाग असणाऱ्या सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघाने अंतिम मुकाबल्यात प्रथम फलंदाजी करताना २५५ धावांचा डोंगर रचला. संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशन या आघाडीच्या शिलेदारांनी वादळी अर्धशतकी खेळी साकारत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. या डोंगरासमोर खेळताना न्यूझीलंडने नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. तिलक वर्माने लॉकी फर्ग्युसनचा झेल घेताच खेळाडूंनी एकच जल्लोष केला. न्यूझीलंडचा डाव १५९ धावांतच आटोपला. कपिल देव, महेंद्रसिंग धोनी, रोहित शर्मा या आयसीसी स्पर्धांची जेतेपदं पटकावणाऱ्या कर्णधारांच्या मांदियाळीत सूर्यकुमारचा समावेश झाला आहे. अहमदाबादच्या याच मैदानावर तीन वर्षांपूर्वी वनडे वर्ल्डकपच्या फायनलमध्ये भारतीय संघाला अनपेक्षित पराभवाला सामोरं जावं लागलं होतं. संपूर्ण स्पर्धेत अपराजित भारतीय संघाला फायनलमध्ये मात्र पराभवाला सामोरं जावं लागलं. तो सल सूर्यासेनेने पुसून काढला. याच मैदानावर प्राथमिक फेरीच्या लढतीत भारतीय संघाला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभवाला सामोरं जावं लागलं होतं. त्या पराभवाने भारतीय संघाच्या उणीवा स्पष्ट झाल्या होत्या. त्या पराभवातून बोध घेत भारतीय संघाने दिमाखदार कामगिरी साकारत जेतेपद साकारलं. हे मैदान पनवती नाही हेही भारतीय संघाने सिद्ध केलं.न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. या निर्णयाने अनेकांच्या भुवया उंचावल्या कारण मोठ्या लढतींमध्ये नाणेफेक जिंकून फलंदाजी पत्करावी, मोठी धावसंख्या रचावी आणि त्याचा बचाव करावा असं धोरण कर्णधार अवलंबतात. सँटनरने वेगळा विचार करत गोलंदाजीचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने फायनलसाठी ऑफस्पिनर कोल मॅकहोनीऐवजी वेगवान गोलंदाज जेकब डफीचा संघात समावेश केला. भारतीय संघाने वरुण चक्रवर्तीवर विश्वास ठेवत त्याला अंतिम अकरात



कायम राखलं.संपूर्ण स्पर्धेत धावांसाठी झगडणाऱ्या अभिषेक शर्माने सावध सुरुवात केली. संजून मॉट हेन्रीच्या पहिल्याच षटकात खणखणीत षटकार लगावत इरादे स्पष्ट केले. न्यूझीलंडने दुसरं षटक फिरकीपटू ग्लेन फिलीप्सला दिलं. या स्पर्धेत भारतीय फलंदाज सातत्याने फिरकीपटूंना बाद होत असल्याचे आकडे सांगत होते. त्यामुळे संजू-अभिशेकने फिलीप्सविरुद्ध धोका पत्करला नाही. स्पर्धेतला केवळ दुसराच सामना खेळणाऱ्या जेकब डफीच्या पहिल्या षटकात अभिषेकने दोन तर संजूने एक चौकार लगावला. या षटकाने दोघांना खेळपट्टीचा अंदाज आला. लॉकी फर्ग्युसनचा वेग या दोघांना अडचणीत आणेल अशी चिन्हं होती. मात्र अत्यंत स्वैर गोलंदाजी करणाऱ्या लॉकीच्या गोलंदाजीवर या जोडीने जोरदार आक्रमण केलं. फर्ग्युसनच्या पहिल्याच षटकात या दोघांनी २४ धावा वसूल केल्या. हेन्रीच्या पुढच्या षटकात दोघांनी २१ धावा चोपून काढल्या. पॉवरप्लेचं शेवटचं षटक डफीला देण्याचा सँटनरचा निर्णय पूर्णतःचुकला. या दोघांच्या आक्रणमासमोर डफीची लय हरपली. क्षेत्ररक्षणाचे निर्बंध असणाऱ्या या षटकात संजू-अभिषेक जोडीने २० धावा कुटल्या. पॉवरप्लेच्या ६ षटकात ९२ धावांची सलामी देत या जोडीने जणू विजयाचा पाया रचला. याच षटकात अभिषेकने अवघ्या १८ चेंडूत अर्धशतकाला गवसणी घातली. यंदाच्या स्पर्धेत पॉवरप्लेमध्ये झालेल्या या सर्वाधिक धावा आहेत. टी२० वर्ल्डकप बाद फेरीच्या सामन्यांमध्ये सर्वाधिक वेगवान अर्धशतकाचा विक्रमही अभिषेकने नावावर केला. पॉवरप्ले संपताच संजू-अभिषेक जोडीचा वेग काहीसा मंदावला. रचीन रवींद्रने अभिषेकला बाद केलं. टीम सैफर्टने अतिशय सुरेख झेल टिपला. अभिषेकने २१ चेंडूत ५२ धावांची वादळी खेळी साकारली. इशान किशनने अभिषेकचाच कित्ता गिरवत खेळपट्टीवर दाखल झाल्यापासून चौकार-षटकारांना सुरुवात केली. टी२० वर्ल्डकप फायनलमध्ये सर्वाधिक धावसंख्येचा विक्रम मागे टाकला.



## बुमराहचा कारनामा!

टीम इंडियाचा वेगवान आणि प्रमुख गोलंदाज जसप्रीत बुमराह हा क्रिकेट विश्वातील टॉपचा बॉलर का आहे, हे त्याने पुन्हा एकदा दाखवून दिलं आहे. क्रिकेट विश्वात यॉर्कर किंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बुमराहने आयसीसी टी 20I वर्ल्ड कप 2026 स्पर्धेत न्यूझीलंड विरुद्ध टीम इंडियसााठी सर्वाधिक 4 विकेट्स मिळवल्या. बुमराहने 4 विकेट्स घेत भारताला चॅम्पियन करण्यात बॉलिंगने प्रमुख भूमिका बजावली. बुमराहला त्याने केलेल्या या कामगिरीसाठी सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. बुमराहने या 4 विकेट्स घेण्यासह मोठा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

## कॅच ऑफ द मॅच!

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना खेळवला जात आहे. भारताने प्रथम फलंदाजी टी-२० विश्वचषक इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारली. संजू सॅमसन, इशान किशन व अभिषेक शर्मा यांच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर टीम इंडियाने ५ बाद २५५ धावा केल्या. तर रनचेसमध्ये इशान किशनने एक अफलातून झेल टिपला.भारताकडून अभिषेक शर्मा व संजू सॅमसनच्या जोडीने पहिल्या विकेटसाठी ९८ धावांची भागीदारी रचली. भारताच्या तिन्ही सुरूवातीच्या फलंदाजांनी अर्धशतकी खेळी करत विक्रम रचला. अभिषेक शर्मा २१ चेंडूत ६ चौकार व ३ षटकारांसह ५२ धावा करत बाद झाला. तर संजू सॅमसनने ४६ चेंडूत ५ चौकार व ८ षटकारांच्या मदतीने ८९ धावांची खेळी केली. पुन्हा एकदा त्याचं शतक हुकलं. तर इशानने २५ चेंडूत ५४ धावा केल्या. शिवाय शिवम दुबेने अखेरच्या षटकांमधअये ८ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांसह २६ धावांची खेळी केली.

# भारत विश्वविजेता!



# अधिवेशनातून थेट रुग्णालय गाठले ; अफवांना पूर्णविराम देत डॉक्टर आमदाराने तपासली रुग्णांची नाडी...!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

गडचिरोली : राजकारणात गेल्यानंतर अनेकजण आपली मूळ ओळख विसरतात, पण गडचिरोलीचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी मात्र आपल्यातील 'डॉक्टर' आजही जिवंत ठेवला आहे. चामोर्शी तालुक्यातील मुरखळा येथील २२ नागरिकांना अचानक ताप आल्याची बातमी समजताच, मुंबईतील अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज आटोपून परतलेल्या डॉ. नरोटे यांनी विश्रांती न घेता थेट जिल्हा रुग्णालय गाठले. रुग्णांची आस्थेने विचारपूस करत त्यांनी स्वतः वैद्यकीय भूमिकेतून परिस्थितीचा सखोल आढावा घेतला. चामोर्शी तालुक्यातील मुरखळा येथील सुमारे २२ जणांना ताप आल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती डॉ. नरोटे यांना अधिवेशनात असताना मिळाली होती.

दरम्यान, सोशल मीडियावर 'हत्तीरोगाच्या गोळ्या घेतल्यामुळे हा ताप आला' अशा चुकीच्या चर्चा आणि अफवा वेगाने पसरू लागल्या होत्या, ज्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

ही बाब गांभीर्याने घेत डॉ. नरोटे



यांनी गडचिरोलीत पोहोचताच सर्वप्रथम रुग्णालयाला भेट देऊन स्वतः जिल्हा शल्य चिकित्सक आणि तज्ज्ञ डॉक्टरांशी या संदर्भात सविस्तर चर्चा केली आहे.

हा ताप कोणत्याही औषधांच्या दुष्परिणामामुळे नसून केवळ 'व्हायरल इन्फेक्शन' (विषाणूजन्य संसर्ग) मुळे आल्याचे स्पष्ट झाले आहे. नागरिकांनी सोशल मीडियावरील कोणत्याही अफवांना बळी पडू नये. सर्व रुग्णांची प्रकृती सध्या धोक्याबाहेर असून ती पूर्णपणे सामान्य आहे," असे स्पष्टीकरण आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी यावेळी दिले. आमदार झाल्यानंतरही डॉ. मिलिंद नरोटे अनेकदा रुग्णांवर उपचार करताना किंवा त्यांच्या प्रकृतीची वैद्यकीयदृष्ट्या तपासणी करताना दिसून येतात. आजही त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांकडून प्रत्येक रुग्णाच्या उपचारांची माहिती घेतली. प्रशासन आणि आरोग्य विभाग परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेवून असून सर्व रुग्णांना दर्जेदार उपचार मिळतील याची खात्री त्यांनी केली. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष भास्कर बुरे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष मधुकर भांडेकर, भाजपा चामोर्शी तालुका महामंत्री शेषराव कोहळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा लहाडे यांच्यासह अन्य पदाधिकारी व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. राजकारणातील व्यस्ततेतही आपल्या मूळ पेशाला जागत रुग्णांच्या मदतीला धावून जाण्याच्या त्यांच्या या कृतीचे जिल्ह्यात कौतुक होत आहे.

# महिला दिनानिमित्त अंतरजी येथे अण्णा हजारे विचार मंचाच्या वतीने सत्कार

विदर्भ केसरी । गडचिरोली

जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे वीचारमंच जिल्हा गडचिरोलीचे वतिने जागतीक महिला दिनाचे औचीत्य साधुन आरमोरी तालुक्यातील मौजा अंतरजी येथे जेष्ठ नागरिक विठोबाजी वाढई व रुकमाबाई सपाटे यांचा सत्कारांचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. अंतरंजी गावचे पोलीस पाटील यांच्या उपस्थितीत आज दिनांक 8.3.2026 रोजी रविवार ला कार्यक्रमाचे आयोजन हनुमान मंदिरात करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे ठिकाणी सत्कार मुर्ती रुखमाबाई सपाटे यांचा सत्कार अण्णा हजारे वीचारमंचे जिल्हा मुख्य



संघटक बसंत सिंह बैस आयोजक ऊषाबाई भानुदास आलोने यांच्या हस्ते साळीचोळिदेवुन सत्कार करण्यात आला.

या 95 वर्षीय आहेत तसेच वयोवृद्ध विठोबाजि वाडई याचे वय 97 वर्षे आहे. यांचा सत्कार अण्णा हजारे वीचारमंचे जिल्हा उपाध्यक्ष अनुरथ निलेकार व जिल्हा सल्लागार दीवाकरराव रामटेके यांचे हस्ते धोतर व शॉल देवुन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपले मत प्रकट केले कार्यक्रमाचे वेळी अण्णा हजारे विचारमंच चे पदाधिकारी देवेंद्रजी बामनवाडे जिल्हा सचिव, तुकाराम नैताम, कोहेन कतरोजवार, अंतरंजी गावातिल नागरीक बालगोपाल बहुतांश महीला उपस्थित होते.

# बळीराजा दुबार संकटात! एकीकडे कर्जमाफीची घोषणा!

## गडचिरोली जिल्ह्यातील 4 हजार 247 शेतकऱ्यांना मिळणार कर्जमाफीचा लाभ

विदर्भ केसरी । गडचिरोली

एकीकडे शासनाकडून शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करण्यात आली आहे. मात्र त्याचवेळी ज्या शेतकऱ्यांनी बँकांकडून पीककर्ज घेतले होते, अशा शेतकऱ्यांचे खाते काही बँकांनी होल्ड केले आहेत. चंद्रपूर (CHANDRAPUR NEWS) जिल्ह्यातील नागभिड तालुक्यात हा प्रकार उघडकीस आलाय. नागभीड येथील बँक ऑफ इंडियाकडून अशा प्रकारे 15 शेतकऱ्यांचे खाते गोठवण्यात आलेले आहेत. नुकताच धानाचा हंगाम आटोपला असून तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी धानाची विक्री शासनाने प्राधिकृत केलेल्या आधारभूत हमीभाव केंद्रांवर केली. त्यानंतर शेतकऱ्यांचे चुकारे आणि बोनसची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली. त्यानंतर धानाचे चुकारे जमा झाल्याचा मॅसेज येताच लोकांचे देणेघेणे करण्यासाठी





संबंधित शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता, तुमच्यावर पीककर्ज थकीत असल्याने तुमचे खाते वरिष्ठ पातळीवरूनच होल्ड करण्यात आले आहेत, त्यामुळे तुम्हाला खात्यावर असलेले पैसे काढता येणार नाही, अशी माहिती बँकेकडून या शेतकऱ्यांना देण्यात आली.नुकताच धानाचा हंगाम आटोपलाय. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी धानाची विक्री शासनाने प्राधिकृत केलेल्या आधारभूत हमीभाव केंद्रांवर केली. शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर धानाचे चुकारे आणि बोनस जमा करण्यास सुरुवात केलीय. तर धानाचे चुकारे जमा झाल्याचा मॅसेज येताच लोकांचे देणेघेणे करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र तुमच्यावर पीककर्ज थकीत असल्याने तुमचे खाते वरिष्ठ पातळीवरूनच होल्ड करण्यात आल्याची त्यांना माहिती देण्यात आलीय. दरम्यान, बँकेने किमान 15 शेतकऱ्यांचे खाते अशाप्रकारे होल्ड केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यांवर बँकांकडून लादण्यात आलेली बंदी त्वरित उठविण्यात यावी, अशी या शेतकऱ्यांची मागणी आहे.गडचिरोली : राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना शुक्रवारी जाहीर केली. या योजनेअंतर्गत 2 लाखापर्यंतचे थकीत कर्ज माफ होणार आहे. याचा लाभ गडचिरोली जिल्ह्यातील 4 हजार 247 कर्जदार शेतकऱ्यांना मिळणार आहे. जिल्ह्यातील 4 हजार 247 शेतकऱ्यांचे तब्बल 36 कोटी 14 लाख 63 हजार रुपयांचे कर्ज थकीत होते. मात्र आता कर्जमाफी योजनेमुळे हे सर्व शेतकरी कर्जमुक्त होणार आहेत. तर नियमित कर्ज भरणाऱ्या 23 हजार 932 शेतकऱ्यांना 50 हजार रुपयाचे प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे.

### खाते वरिष्ठ पातळीवरूनच होल्ड

शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर धानाचे चुकारे आणि बोनस जमा करण्यास सुरुवात केलीय. तर धानाचे चुकारे जमा झाल्याचा मॅसेज येताच लोकांचे देणेघेणे करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र तुमच्यावर पीककर्ज थकीत असल्याने तुमचे खाते वरिष्ठ पातळीवरूनच होल्ड करण्यात आल्याची त्यांना माहिती देण्यात आलीय. दरम्यान, बँकेने किमान 15 शेतकऱ्यांचे खाते अशाप्रकारे होल्ड केले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यांवर बँकांकडून लादण्यात आलेली बंदी त्वरित उठविण्यात यावी, अशी या शेतकऱ्यांची मागणी आहे.

# रेती उत्खनन वादावरून दोन गटांमध्ये हाणामारी

विदर्भ केसरी । चंद्रपूर

चंद्रपूर शहरातून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. रेती उत्खनन आणि सीमांकनाच्या वादावरून (Demarcation Dispute) दोन गटांमध्ये तुफान हाणामारीची (Crime News) घटना घडली आहे. या हाणामारीत एकाचा मृत्यू झाला असून इतर दोन जखमी झाल्याची माहिती आहे. भारत नागपाल (40) असं मृतकाचं नाव असून तो वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथील रहिवासी आहे. वरोरा तालुक्यातील वर्धा नदीच्या तीरावर असलेल्या बामुर्डा घाटावरील रविवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडलीय. त्यामुळे पुन्हा एकादा रेती उत्खनन आणि त्यावरून होणाऱ्या वादाचा मुद्दा चर्चेत आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पुढील तपास सुरु केला आहे. मिळलेल्या माहिती नुसर, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यात असलेल्या वर्धा नदीच्या ढिवरी-पिपर येथील रेती घाटाचा शासनाकडून लिलाव झाला होता.

मात्र या घाटावरून रेती उत्खनन आणि सीमांकनावरून वर्धा जिल्ह्यातीलच दोन गटांमध्ये काल रात्री वाद झाला. कालांतराने हा वाद विकोपाला जाऊन यात मारामारी झाली. दरम्यान यातील एक गट चंद्रपूर जिल्ह्याच्या हद्दीत आले आणि या ठिकाणी नागपालचा या हाणामारीत मृत्यू झाला. या प्रकरणी वरोरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून वर्धा जिल्ह्यातील वडनेर पोलिसांनी अटक केलेल्या 3 लोकांना वरोरा पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतले आहे. तर मृतक नागपाल याचा मृतदेह हिंगणघाट येथे नेण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.